# सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांसाठी सरकारी योजना

संकलन - मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड अॅग्रिकल्चर, पुणे (एमसीसीआयए)

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांना (एमएसएमई) मदत करण्यासाठी केंद्र सरकारच्या विविध विभागांमार्फत अनेक योजना राबविण्यात येतात. त्या विषयीची माहिती या सादरीकरणात देण्यात आली आहे.

एमएसएमई मंत्रालय, एमएसएमई विकास आयुक्तालय, राष्ट्रीय लघुउद्योग महामंडळ (एनएसआयसी) व कृषी व ग्रामविकास मंत्रालयाच्या विविध योजनांचा या सादरीकरणामध्ये समावेश आहे. या संदर्भातील अधिक माहितीसाठी, शंकानिरसनासाठी आपण आमच्याशी govt.schemes@mcciapune.com या ई-मेल आयडीवर संपर्क साधू शकता.

# अनुक्रमणिका


अ. क्षमता व क्षमतावृद्धी (१६ योजना)........................................ ३

ब. व्यवसायविस्तारासाठी सहाय्य (८ योजना)................................. ७२

क. कर्जपुरवठा व आर्थिक सहाय्य (७ योजना)............................... १०१

ड. इन्क्युबेशन सहाय्य (३ योजना)............................................ १२७

ई. अन्य सहा (४ योजना)......................................................... १४१

# अ) क्षमता व क्षमतावृद्धीसंदर्भातील योजना

१) लीन मॅन्युफॅक्चरिंग स्पर्धात्मकता योजना........................................................ ५
२) झिरो डिफेक्ट झिरो इफेक्ट ................................................................................ ९
३) डिजिटल सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक योजना................................................ १४
४) सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी समूह विकास उपक्रम ..................................................... २०
५) दर्जा व्यवस्थापन मानके व दर्जा तंत्रज्ञान साधने..................................................... २५
६) विपणन सहाय्य व तांत्रिक सुधारणा ....................................................................... २९
७) कच्च्या मालासाठी सहाय्य ..................................................................................... ३३
८) अॅस्पायर योजना (नवसंशोधन, आंत्रप्रेनरशीप व कृषी उद्योगांसाठी योजना )........................ ३७
९) कॉयर (काथ्या) उद्योजकांसाठी योजना ..................................................................... ४१
१०) विपणन सहाय्य / सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना सहाय्य (बार कोड)......................... ४४
११) बौद्धिक संपदा हक्काविषयी (आयपीआर) जागरूकता वाढविणे............................................ ४७
१२) उत्पादन क्षेत्रातील सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना डिझाइनिंग विषयी मार्गदर्शन करणारी डिझाइन क्लिनिक योजना........................................................................................ ५२
१३) कौशल्य विकास व महिला कॉयर (काथ्या) योजना ........................................................ ५६
१४) सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांसाठी तांत्रिक तसेच दर्जासुधार योजना............................ ६०
१५) उत्पादन सुविधा विकास योजना ............................................................................ ६५
१६) पारंपरिक उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी सुधारित योजना (स्फूर्ती)................................... ६९

**क्षमतावृद्धी (१/१६)** व्यवसायविस्तारासाठी सहाय्य कर्जपुरवठा इन्क्युबेशन अन्य

# लीन मॅन्युफॅक्चरिंग कॉम्पिटिटिव्हनेस स्कीम

**कोण अर्ज करू शकते**

ही योजना उत्पादन क्षेत्रातील सर्व सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांसाठी खुली आहे. या कंपन्यांनी उद्यम नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. या सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांनी किमान सहा (दहा कंपन्यांचा समूह आदर्श) कंपन्यांचा छोटा समूह (मिनी क्लस्टर) स्थापन करणे गरजेचे आहे. त्यांनी या योजनेत सहभागी होण्यासाठी परस्पर सामंजस्य करार (एमओयू) करणेही बंधनकारक आहे.

**आर्थिक सहाय्याचे स्वरूप**

केंद्र सरकारकडून प्रत्येक छोट्या समूहाला सल्लागार शुल्काच्या ८० टक्के रक्कम अनुदान म्हणून दिली जाते. उर्वरित २० टक्के रक्कम संबंधित समूहातील कंपन्यांनी भरायची असते.

# लीन मॅन्युफॅक्चरिंग कॉम्पिटिटिव्हनेस स्कीम

**योजनेविषयी**

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांची स्पर्धात्मकता वाढवणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.
लीन मॅन्युफॅक्चरिंगमध्ये उत्पादनाशी निगडित विविध प्रक्रियांमध्ये होणारा अनाठायी अपव्यय (वेस्टेज) टाळण्यासाठी लीन तंत्रज्ञानाचा अवलंब (टोटल प्रॉडक्टिव्ह मेन्टेनन्स, ५ एस, व्हिज्युअल कंट्रोल, स्टँडर्ड ऑपरेशन प्रोसिजर, जस्ट इन टाइम, कॅनबॅन सिस्टीम, सेल्युलर ले-आऊट, पोका योके, टीपीएम आदी) करण्याचा समावेश असतो.
उत्पादन प्रक्रियेतील काही विशिष्ट प्रक्रियांमध्येच सुधारणा न करता संपूर्ण प्रक्रिया सुधारण्यावर या योजनेचा भर आहे. याशिवाय याद्वारे कामगारांचे प्रशिक्षण, क्षमतावृद्धी व सक्षमीकरण साध्य होते.

**अर्ज कसा करावा**

इच्छुक औद्योगिक संघटना अथवा (एमएसएमई विकास कायदा २००६ नुसार पात्र ठरणाऱ्या) तसेच छोटा समूह (मिनी क्लस्टर) उभारण्याची तयारी असलेला सहा ते दहा सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक उद्योजकांचा समूह विहित नमुन्यात केंद्र सरकारच्या एमएसएमई मंत्रालयाने नेमून दिलेल्या संस्थांकडे अर्ज सादर करू शकतो.

# लीन मॅन्युफॅक्चरिंग कॉम्पिटिटिव्हनेस स्कीम

**अंमलबजावणीची प्रक्रिया**

यामध्ये लीन मॅन्युफॅक्चरिंग सल्लागार (एलएमसी) हे या छोट्या समूहातील सर्व उत्पादकांच्या उत्पादन केंद्रांना भेट देतात. तेथील उत्पादन प्रक्रियेची पाहणी करतात. त्यानंतर लीन मॅन्युफॅक्चरिंग साध्य करण्यासाठी आवश्यक त्या प्रक्रिया व त्याचे वेळापत्रक निश्चित करतात. आणि नंतर प्रशिक्षण व मार्गदर्शन करतात.

लीन मॅन्युफॅक्चरिंग तंत्रज्ञानानुसार होणारी बचत व फायदे याचा लाभ घेतल्यानंतर व सदर योजनेचा कालावधी संपल्यानंतर संबंधित उद्योग घटकांनी ही योजना त्यांनी  स्वतःहून स्वतःच्या खर्चाने राबविणे अपेक्षित आहे.

**क्षमतावृद्धी (२/१६)** | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य

# झिरो डिफेक्ट झिरो इफेक्ट (झेडईडी)

**कोण अर्ज करू शकते**

उद्योग आधार क्रमांक असलेले कोणतेही सूक्ष्म लघु मध्यम उद्योजक (एमएसएमई) डिफेक्ट झिरो इफेक्ट योजनेसाठी नोंदणीस पात्र आहेत. त्यासाठी या उद्योगाच्या नावाने झेडईडी सर्टिफिकेशन मिळविण्याचा उद्देश असल्याचे स्व-घोषणापत्र किंवा हमीपत्र सादर करावे लागते. यामध्ये संबंधित युनिटला झिरो डिफेक्ट अँड झिरो इफेक्ट उत्पादनासाठी ऑनलाइन पद्धतीने स्वयंचाचणीदेखील (सेल्फ अॅसेसमेंट) पूर्ण करावी लागते.

**सहकार्याचे स्वरूप**

संबंधित उद्योगाचे मानांकन (रेटिंग) केल्यानंतर त्यांना त्रुटींच्या विश्लेषणासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाते.

मानांकन सुधारण्यासाठी व झिरो इफेक्टकडे वाटचाल करण्यासाठी करावयाच्या उपायोजनांबाबत सल्ला दिला जातो तसेच मार्गदर्शन केले जाते. कांस्य मानांकन मिळाल्यानंतर संबंधित उद्योग प्रत्यक्ष सहकार्यासाठी (हँडहोल्डिंग) अर्ज करू शकतात. प्रत्येक सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक या प्रकल्पासाठी पाच लाख रुपयांपर्यंतचा खर्च करू शकते. (प्रत्यक्ष खर्चावर ही बाब अवलंबून आहे).

# झिरो डिफेक्ट झिरो इफेक्ट (झेडईडी)

क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया (क्यूसीआय) ही या योजना राबविण्यासाठी मान्यताप्राप्त संस्था असेल. याखेरीज गरजेनुसार अन्य संस्थांचाही यात समावेश केला जाईल.
एमएसएमई विकास आयुक्तांच्या (डीसी-एमएसएमई) नॅशनल मॉनिटरिंग अँड इम्प्लिमेन्टेशन युनिटतर्फे (एनएमआययू) यासाठीची सविस्तर मार्गदर्शक तत्वे जाहीर केली जातील.

**योजनेविषयी**

ही योजना सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना झिरो डिफेक्ट, झिरो इफेक्ट (झेडईडी) उत्पादनासाठी प्रोत्साहन देते, तसेच त्यांच्या मानांकनासाठी सहकार्य करते. जसे की, सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना अद्ययावत तंत्रज्ञान व साधनांचा वापर करून उत्पादनाचा दर्जा सुधारणे, त्याचबरोबर त्यांची उत्पादन प्रक्रिया अद्ययावत करून पर्यावरणावर कमीतकमी परिणाम होईल, हे पाहणे. झिरो डिफेक्ट, झिरो इफेक्ट इकोसिस्टिम विकसित करणे. त्यांची स्पर्धात्मकता वाढविणे. दर्जासुधाराला प्राधान्य देणे. यशस्वी सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना प्रोत्साहित करणे. झेडईडी रेटिंग्जच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांमध्ये झिरो डिफेक्ट,झिरो इफेक्ट उत्पादनांविषयी जागृती निर्माण करणे तसेच तक्रारींचे निवारण करणे.

# झिरो डिफेक्ट झिरो इफेक्ट (झेडईडी)

**झेडईडी सर्टिफिकेशन**

झेडईडी सर्टिफिकेशन पाच पातळ्यांवर मिळते.

पहिली पातळी - स्वयं-प्रमाणीकरण - कांस्य

दुसरी पातळी - मानकांची पूर्ती करणे - रौप्य

तिसरी पातळी- प्राविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे - सुवर्ण

चौथी पातळी - प्राविण्य प्राप्त करणे - हीरक (डायमंड)

पाचवी पातळी -झेडईडी सर्टिफिकेशन - प्लॅटिनम

# झिरो डिफेक्ट झिरो इफेक्ट (झेडईडी)

**अर्ज कसा करावा**

ही योजना ऑनलाइन उपलब्ध आहे. यासाठी ऑनलाइन अर्ज मागवले जातात आणि एनएमआययू तसेच अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांतर्फे त्यावर ऑनलाइन पद्धतीनेच पुढील प्रक्रिया केली जाते. ई-लर्निंग, डेटा व्यवस्थापन, प्रक्रिया व देखभाल याच प्लॅटफॉर्मद्वारे पार पडते. नेमून दिलेल्या संस्थांतर्फेच ऑनलाइन सहाय्यदेखील पुरविण्यात येते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्षमतावृद्धी (३/१६)** | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# डिजिटल सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक योजना

**योजना कोणासाठी**

एमएसएमई कायदा २००६ व त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार नोंदणीकृत एमएसएमईजसाठी, तसेच एमएसएमई विकास आयुक्तांनी एमएसएमई कायद्याच्या अधीन राहून वेळोवेळी काढलेल्या कार्यकारी आदेशांनुसार समाविष्ट एमएसएमईजसाठी ही योजना लागू आहे.

**सहाय्याचे स्वरूप**

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना आरेखनाबाबतचे (डिझाइन) नवे धोरण आखता यावे किंवा आरेखनाशी संबंधित उत्पादन विकसित करता यावे, यासाठी आरेखनाबाबतचा सल्ला व मदत करणे हा या योजनेचा उद्देश आहे. याअंतर्गत सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना आरेखानासंदर्भातील कामासाठी आरेखन सल्लागार नेमता यावा, यासाठी अर्थसहाय्य केले जाते. केंद्र सरकार पंधरा ते चाळीस लाख रुपयांच्या प्रकल्पांसाठी सूक्ष्म उद्योगांना ७५ टक्के, तर लघु व मध्यम उद्योगांना ६० टक्के मदत करते. ही सरकारी मदत परताव्याच्या स्वरूपात तीन टप्प्यात दिली जाते.

# डिजिटल सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक योजना

प्रत्येक टप्प्यावर सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना तितकाच निधी द्यावा लागतो. प्रत्येक टप्प्यावर त्याची पडताळणीही केली जाते. त्यासाठी सुयोग्य रचना तयार केली जाते. ही रक्कम तीन टप्प्यात अदा केली जाते.

पहिला टप्पा - धोरण व संकल्पना - ४० टक्के

दुसरा टप्पा - बारकाव्यांसहित आरेखन - ३० टक्के

तिसरा टप्पा - यशस्वी अंमलबजावणी व पूर्तता अहवाल -३० टक्के

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना डिजिटल अस्तित्वासाठी सक्षम करत त्यांना माहिती तंत्रज्ञान व त्यावर आधारित यंत्रणांचा त्यांच्या उत्पादन व व्यवसाय प्रक्रियांसाठी सुयोग्य वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांसाठी त्यांची स्पर्धात्मकता वाढविणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

# डिजिटल सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक योजना

**योजनेचे सर्वसाधारण फायदे**

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना माहिती तंत्रज्ञानाचा दळणवळण माध्यम म्हणून वापर करून बाजारपेठांची अद्ययावत माहिती घेता यावी. व ऑनलाइन स्थिर व चल माहितीच्या आधारे त्यांचे व्यवस्थापकीय व तांत्रिक ज्ञान विकसित करता येईल.

माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे माहिती मिळवणे, त्यावर प्रक्रिया करणे, त्याचे एकत्रीकरण करणे व वापर अथवा प्रसार करण्यासाठीची प्रक्रिया यांत्रिकी पद्धतीने करणे व त्यातून खर्चात कपात साधत क्षमतावृद्धी करणे.

या योजनेअंतर्गत सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना त्यांच्या व्यवसाय प्रक्रियांचे प्रमाणीकरण, पूर्तता वेळेत सुधारणा, साठवणुकीचा खर्च किंवा भार, उत्पादकतेत सुधारणा, दर्जा सुधार, किंमत व वेळेवर नियंत्रण, ग्राहकांच्या समाधानात वाढ असे अनेक फायदे मिळतात.

# डिजिटल सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक योजना

**योजनेविषयी**

भारतातील उत्पादन क्षेत्र आणि डिझाइनमधील तज्ज्ञ, समूह यांना एकाच प्लॅटफॉर्मवर आणणे, तज्ज्ञांचा सल्ला उपलब्ध करून देणे, डिझाइन संबंधित समस्यांना तत्काळ उपाययोजना सुचवणे, नवीन उत्पादन विकसित करणे, सातत्यपूर्ण सुधारणा करणे आणि सध्याच्या उत्पादनांमध्ये मूल्यवर्धन करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

या योजनेअंतर्गत उत्पादन क्षेत्रातील सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना एमएसएमई कायदा २००६ व त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार सहाय्य मिळू शकते. त्याचबरोबर एमएसएमई विभागातर्फे वेळोवेळी काढण्यात आलेल्या अध्यादेशांनुसार पात्र सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकदेखील या योजनांचा लाभ घेऊ शकतात.

# डिजिटल सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक योजना

**अंमलबजावणीची प्रक्रिया**

एमएसएमई विकास आयुक्तांच्या कार्यालयामार्फत देशभर उद्योजकता विकास कक्ष (ईडीसी)ची स्थापना केली जात आहे. या ईडीसींच्या माध्यमातून डिजिटल साक्षरता-ई मार्केटिंगशी संबंधित विविध उपक्रम राबवले जाऊ शकतात. ईडीसी या संदर्भातील माहिती देण्यासाठी तसेच सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक व विद्यार्थ्यांमध्ये जागृती करण्यासाठी प्रमुख संस्था (नोडल एजन्सी) म्हणूनही काम करू शकतात. यासाठी प्रत्येक ईडीसीला एकवेळ एक लाख रुपयांचे अनुदानही मिळू शकते. या अनुदानाचा वापर माहिती तंत्रज्ञान उपकरणे, पायाभूत सुविधा आणि तांत्रिक साह्यासाठीही करता येईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्षमतावृद्धी (४/१६)** | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी समूह विकास योजना

**कोण अर्ज करू शकते**
औद्योगिक संघटना, समूह

**सहाय्याचे स्वरूप**

- कमतरतांचा शोध
- आवश्यक हस्तक्षेप
- सामायिक सुविधा केंद्रांची स्थापना (सीएफसी)
- पायाभूत सुविधांचा विकास (नूतनीकरण-नवनिर्माण)

प्रकल्पासाठीचा खर्च व सरकारी सहाय्याचे स्वरूप
कमतरतांचा शोध - खर्चाची कमाल मर्यादा - २.५० लाख

# सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी समूह विकास योजना

छोट्या उद्दिष्टांसाठीचा हस्तक्षेप - प्रकल्पाची कमाल किंमत -२५ लाख, केंद्र सरकारचे सहकार्य ७५ टक्के, (विशेष दर्जा असलेल्या राज्यांमध्ये महिला अथवा सूक्ष्म उद्योजक अथवा ग्रामीण भागातील समूह अथवा एससी अथवा एसटी उद्योजकांचे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक असलेल्या क्लस्टर्ससाठी ९० टक्के)

मोठ्या उद्दिष्टांसाठींचा हस्तक्षेप - सामायिक सुविधा केंद्रांची निर्मिती - एकूण प्रकल्पाची कमाल खर्च मर्यादा १५ कोटी रुपये. यात सरकारचा हिस्सा ७० टक्के. (विशेष दर्जा असलेल्या राज्यात ९० टक्के. तर महिला, लघुउद्योजक, ग्रामीण, एससी व एसटी युनिट्स ५० टक्क्यांपेक्षा अधिक असल्यास ९० टक्के).
सध्या अस्तित्वात असलेल्या अथवा नव्या औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास. प्रकल्पासाठी कमाल खर्च मर्यादा १० कोटी. सरकारचा हिस्सा ६० टक्के. (विशेष दर्जा असलेल्या राज्यांमध्ये तसेच महिला उद्योजक, लघुउद्योजक, एससी, एसटी उद्योजकांचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा अधिक असल्यास ८० टक्के).

# सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी समूह विकास योजना

**योजनेविषयी**
एमएसएमई मंत्रालयातर्फे सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक उद्योजकांची उत्पादकता आणि स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी तसेच क्षमतावृद्धीसाठी समूह विकास योजना राबवली जाते. समूहाची स्थापना केल्याने या उद्योजकांना बँका तसेच पतसंस्थांसह अन्य सेवापुरवठादारांकडून अधिक चांगल्या, किफायतशीर सेवा मिळू शकते. त्यामुळे उत्पादन खर्चातही कपात होते आणि दर्जेदार सेवाही उपलब्ध होतात.

योजनेची उद्दिष्टे

- सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक उद्योगांच्या शाश्वत विकासासाठी, प्रगतीसाठी सहकार्य करणे, त्यांना तंत्रज्ञान विकास, कौशल्य व दर्जा, बाजारपेठांची उपलब्धता व भांडवल अशा सामायिक समस्या सोडविण्यासाठी मदत करणे.
- सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना स्व-मदत गट, समूह, संघटना स्थापन करून त्याद्वारे सर्वांना लाभदायी ठरणारे उपक्रम राबवता येतील.

# सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी समूह विकास योजना

- सध्या अस्तित्वात असलेल्या किंवा नव्याने उभ्या राहात असलेल्या औद्योगिक परिसरात किंवा समूहाच्या परिसरात औद्योगिक सुविधा निर्माण करणे किंवा त्या अद्ययावत करणे.
- सामायिक सुविधा केंद्र उभारणे. (यामध्ये चाचणी, प्रशिक्षण, कच्च्या मालासाठी गोदाम, सांडपाणी प्रक्रिया, उत्पादनासाठी साह्याभूत प्रक्रिया आदींचा समावेश असतो.)

**अर्ज कसा करावा**

यासाठीचे अर्ज केवळ ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारले जातात. या अर्जाची प्रत राज्य सरकार किंवा सरकारने नेमलेल्या स्वायत्त संस्था किंवा एमएसएमई मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या संस्थांमार्फत पाठवता येईल. (एमएसएमई-डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट). मात्र, हा अर्ज एमएसएई-क्लस्टर डेव्हलपमेंट प्रोग्रॅमच्या सुकाणू समितीने मंजूर करणे आवश्यक आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्षमतावृद्धी (५/१६)** | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# दर्जा व्यवस्थापन मानके व दर्जा व्यवस्थापन साधने

**कोण अर्ज करू शकतो**

क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया (क्यूसीआय), नॅशनल रिक्रुटमेंट बोर्ड फॉर पर्सोनेल अँड ट्रेनिंग, कन्सलटन्सी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, नॅशनल प्रॉडक्टिव्हिटी कौन्सिल, स्टँडर्डायझेशन टेस्टिंग अँड क्वालिटी सर्टिफिकेशन (एसटीक्यूसी), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्वालिटी मॅनेजमेंट (आयआयक्यूएम) यासारख्या तज्ज्ञ संस्था, दर्जा व्यवस्थापन व दर्जा तंत्रज्ञान साधनांच्या क्षेत्रात रस असलेल्या औद्योगिक संघटना, तंत्रज्ञान संस्था, इंजिनीअरिंग कॉलेजेस, टूल रुम्स व तत्सम संस्था तसेच लघु व मध्यम उद्योग.

# दर्जा व्यवस्थापन मानके व दर्जा व्यवस्थापन साधने

**सहाय्याचे स्वरूप**

तंत्रज्ञ संस्थांमध्ये पूरक अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे.

तज्ज्ञ संस्था अथवा औद्योगिक संघटनांना दर्जा व्यवस्थापन मानकांसंदर्भात जनजागृती करण्यासाठी कार्यशाळा घेण्यासाठी निधी देणे.

कॉम्पिटिशन वॉच (सी-वॉच) आयोजित करण्यासाठी, अभ्यासासाठी तसेच पडताळणीसाठी निधी उपलब्ध करून देणे.

तज्ज्ञ संस्था अथवा औद्योगिक संघटनांना निवडक सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांमध्ये (एमएसएमई) दर्जा व्यवस्थापन मानके अथवा दर्जा तंत्रज्ञान साधनांचा अवलंब करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे.

पाहणी व सल्ला समितीने निवडलेल्या सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यात सहभागी करून घेणे.

# दर्जा व्यवस्थापन मानके व दर्जा व्यवस्थापन साधने

**योजनेविषयी**

सूक्ष्म,लघु व मध्यम उद्योगांना अद्ययावत दर्जा व्यवस्थापन मानके व दर्जा तंत्रज्ञान साधनांविषयी माहिती देणे तसेच त्यांना त्याचा वापर करण्यास प्रोत्साहित करणे.

**अर्ज कसा करावा**

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक उद्योग वा समूह एमएसएमई विकास आयुक्तालयाशी संपर्क साधू शकतात. याच कार्यालयातर्फे दर्जा व्यवस्थापन मानके व दर्जा तंत्रज्ञान साधनांविषयीच्या जागरूकता कार्यक्रमाविषयी सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक अथवा समूहाची निवड केली जाईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्षमतावृद्धी (६/१६)** | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# विपणन सहकार्य व तंत्रज्ञान अद्ययावतीकरण

**कोण अर्ज करू शकते**

स्वारस्य अभिव्यक्ती (एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट) मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केलेली कोणतीही सक्षम संस्था, सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक, औद्योगिक संघटना अथवा स्वयंसेवी संस्था (एनजीओ)

**सहाय्याचे स्वरूप**

नव्या पॅकेजिंग तंत्रज्ञानाबाबत जनजागृती करण्यासाठी निधी देणे (स्वारस्य अभिव्यक्तीनुसार पात्र अर्जदारांना).

पॅकेजिंगची सद्यस्थिती व अद्ययावतीकरणाची गरज यांचा समूहस्तरावरील अभ्यास (स्वारस्य अभिव्यक्तीनुसार पात्र अर्जदारांसाठी).

संस्थास्तरावर (युनिट) पॅकेजिंग गरजांमधील सुधारणांसाठी हस्तक्षेप (पथदर्शी प्रकल्प) (स्वारस्य अभिव्यक्तीनुसार पात्र अर्जदारांसाठी).

# विपणन सहकार्य व तंत्रज्ञान अद्ययावतीकरण

आधुनिक विपणन तंत्रज्ञानासाठी कौशल्यवृद्धी किंवा विकासाकरता विविध उपक्रम राबविण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे ( स्वारस्य अभिव्यक्तीनुसार पात्र अर्जदारांसाठी)

ईशान्य भारतातील सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना विपणनासंदर्भातील कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी निधी देणे.

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना राज्यस्तरीय अथवा जिल्हास्तरीय प्रदर्शन, विक्री महोत्सवात सहभागी होण्यासाठी (परतावा स्वरूपात) निधी देणे. (नोंदणीकृत सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांसाठीच).

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना कॉर्पोरेट गव्हर्नन्स पद्धती आत्मसात करण्यासाठी (परतावा स्वरूपातच) निधी देणे. (नोंदणीकृत सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांसाठीच).

मध्यवर्ती विपणन केंद्र (मार्केटिंग हब) उभे करण्यासाठी निधी देणे.

आयएसओ १८०००,आयएसओ २२०००, आयएसओ २७००० प्रमाणपत्रांसाठी सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना खर्च परतावा देणे.

# विपणन सहकार्य व तंत्रज्ञान अद्ययावतीकरण

**योजनेबाबत**

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना जागतिक बाजारपेठांच्या अपेक्षेनुसार अत्याधुनिक विपणन तंत्रांचा वापर करता यावा, यासाठी केंद्र सरकारने ही योजना तयार केली आहे. ही योजना आठ उपविभागात विभागलेली आहे. या आठही उपविभागांना केंद्र सरकारचे सहाय्य कमी अधिक प्रमाणात उपलब्ध आहे.

# विपणन सहकार्य व तंत्रज्ञान अद्ययावतीकरण

**अर्ज कसा करावा**

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना राज्यस्तरीय अथवा जिल्हास्तरीय प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी एमएसएमई विकास आयुक्तालयाने नेमलेली योजना सुकाणू समिती (एसएससी) एमएसएमई विकास संस्था, औद्योगिक संघटना आणि स्वयंसेवी संस्थांकडून आलेल्या अर्जांमधून सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक समूह, कंपनी (युनिट) ची राज्य, जिल्हा, स्थानिक पातळीवरील प्रदर्शन अथवा विक्री महोत्सवात सहभागी होण्यासाठी निवड करेल.

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकाने प्रमाणपत्रासाठी आलेल्या खर्चाच्या परताव्यासाठी विहित नमुन्यात आवश्यक त्या कागदपत्रांसह स्थानिक एमएसएमई विकास संस्थेकडे अर्ज सादर करावा.

योजनेच्या मार्गदर्शक तत्वांसह अर्ज http://www.dcmsme.gov.in/schemes/MarkAssis.pdf येथे उपलब्ध आहे.

हा अर्ज भरून आवश्यक त्या कागदपत्रांसह विभागीय एमएसएमई विकास संस्थेकडे पाठवायचा आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्षमतावृद्धी (७/१६)** | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# कच्च्या मालासाठी सहाय्य

**कोण अर्ज करू शकते**
नोंदणीकृत सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक

**सहाय्याचे स्वरूप**
९० दिवसांपर्यंत कच्चा माल खरेदी करण्यासाठी आर्थिक सहाय्य.
सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना घाऊक खरेदी, रोख सवलतीसारख्या सवलतींचा लाभ मिळण्यासाठी सहाय्य. आयातीसंदर्भातील सर्व प्रक्रिया, कागदपत्रे व लेटर ऑफ क्रेडिटसाठी संपूर्ण सहकार्य.

# कच्च्या मालासाठी सहाय्य

**योजनेविषयी**

या योजनेद्वारे सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना भारतातून अथवा परदेशातून कच्चा माल खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. त्याद्वारे सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना दर्जेदार उत्पादनावर लक्ष्य केंद्रित करण्याची संधी मिळते.

**अर्ज कसा करावा**

उद्योजक विहित नमुन्यात आवश्यक ती कागदपत्रे व शुल्कासह राष्ट्रीय लघुउद्योग महामंडळ (नॅशनल स्मॉल स्केल कॉर्पोरेशन) च्या विभागीय अथवा स्थानिक कार्यालयात अर्ज करू शकतात. अधिक माहितीसाठी एनएसआयसीची वेबसाइट पाहावी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्षमतावृद्धी (८/१६)** | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# ॲस्पायर ( नवसंशोधन, आंत्रप्रेनरशिप व कृषी उद्योगासाठीची प्रोत्साहन योजना )

**कोण अर्ज करू शकते**

तांत्रिक ज्ञान अथवा संशोधनाच्या आधारे व्यावसायिक संकल्पना प्रत्यक्षात आणू शकणाऱ्या व्यक्ती अथवा कृषीआधारित व्यावसायिक. त्यांना ज्ञान सहयोगी संस्था (नॉलेज पार्टनर) म्हणून संबोधण्यात येईल. ते सध्या अस्तित्वात असलेल्या तंत्रज्ञानाचा किंवा नवतंत्रज्ञानाचा व्यावसायिक वापर करण्याच्या दृष्टीने काम करतील. इन्क्युबेटर-इन्क्युबेशनसाठी तसेच ही योजना व बिझनेस इन्क्युबेटर्स अथवा तंत्रज्ञान, बिझनेस इन्क्युबेटर्स व सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक किंवा एनएसआयसी किंवा केव्हीआयसी किंवा कॉयर बोर्ड किंवा अन्य मंत्रालय किंवा विभाग यांच्या इन्क्युबेशन योजना तसेच खासगी इन्क्युबेटर्स.

# अॅस्पायर ( नवसंशोधन, आंत्रप्रेनरशिप व कृषी उद्योगासाठीची प्रोत्साहन योजना )

**सहाय्याचे स्वरूप**

उत्पादन केंद्र व यंत्रणेसाठी १०० टक्के अनुदान एकरकमी दिले जाते. हे अनुदान (जमीन व बांधकामाशिवाय) जास्तीत जास्त एक कोटी रुपयांपर्यंत मिळते.

इन्क्युबेशन सेंटर हे एनएसआयसी, केव्हीआयसी, कॉयर बोर्ड किंवा अन्य कोणत्याही संस्था, केंद्र अथवा राज्य सरकारी संस्थासोबत खासगी सार्वजनिक भागीदारीतून (पीपीपी) उभारले जाणार असल्यास त्यासाठी एकरकमी ५० टक्के किंवा जास्तीत जास्त ५० लाख रुपये उत्पादन केंद्र व यंत्रणेसाठी (जमीन व बांधकामाशिवाय) दिले जातात. प्रशिक्षणार्थींच्या प्रशिक्षणासाठी येणारा खर्च प्रशिक्षण संस्थांसाठी सहाय्य (असिस्टन्स टू ट्रेनिंग इन्स्टिट्यूशन-एटीआय) योजनेअंतर्गत दिला जातो.

# ॲस्पायर ( नवसंशोधन, आंत्रप्रेनरशिप व कृषी उद्योगासाठीची प्रोत्साहन योजना )

**योजनेविषयी**

नव्या रोजगारसंधी निर्माण करणे व बेरोजगारी कमी करणे.
भारतात उद्योजकता संस्कृती रूजवणे.
जिल्हापातळीवर आर्थिक विकासाला चालना देणे.
अद्याप भेडसावणाऱ्या सामाजिक गरजांसाठी नवसंशोधन, व्यवसायांसाठी सहाय्य करणे.
सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक क्षेत्राची स्पर्धात्मकता अधिक वाढावी, यासाठी नवसंशोधनावर अधिक भर देणे.

**अर्ज कसा करावा**

यासाठी पूर्ण भरलेले अर्ज एमएसएमई मंत्रालयाच्या ॲस्पायर योजना सुकाणू समितीकडे पाठवता येतील. संपूर्ण योजना, समन्वय, व्यवस्थापन सहाय्य यासाठी ही सुकाणू समिती जबाबदार असेल. एमएसएमई मंत्रालयाचे सचिव या समितीचे अध्यक्ष असतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्षमतावृद्धी (९/१६)** | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# काथ्या (कॉयर) उद्यमी योजना

**कोण अर्ज करू शकतो**

व्यक्ती, कंपनी, बचतगट, स्वयंसेवी संस्था, सोसायटी कायदा १८६० च्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था, उत्पादन सहकारी संस्था, समूह दायित्व संस्था व धर्मादाय संस्था

**सहाय्याचे स्वरूप**

प्रकल्पाचा अधिकतम खर्च १० लाख व खेळते भांडवल अतिरिक्त. खेळते भांडवल प्रकल्प खर्चाच्या २५ टक्क्यांहून अधिक नसावे.

लाभार्थ्यांचा हिस्सा प्रकल्प खर्चाच्या ५ टक्के, बँकेचे कर्ज ५५ टक्के, अनुदान ४० टक्के.

# काथ्या (कॉयर) उद्यमी योजना

**योजनेविषयी**
या योजनेत दहा लाख रुपये अधिक त्याच्या पंचवीस टक्क्यांपर्यंतचे खेळते भांडवल असलेल्या काथ्या प्रकल्पासाठीच्या कर्जासाठी अनुदान दिले जाते. मात्र, खेळत्या भांडवलासाठी अनुदान दिले जात नाही.

**अर्ज कसा करावा**
कॉयर बोर्ड कार्यालय, जिल्हा उद्योग केंद्र, कॉयर प्रोजेक्ट ऑफिस, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा कॉयर बोर्डाने अधिकृत केलेल्या एजन्सीजमधून अर्ज मिळवता येतो. हा अर्ज भरून कॉयर बोर्ड फिल्ड ऑफिसर्स अथवा जिल्हा उद्योग केंद्राकडे सादर करावा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्षमतावृद्धी (१०/१६)** | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# विपणन सहकार्य-सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना सहाय्य (बार कोड)

**कोण अर्ज करू शकते**

ईएम २ स्वरूपाची नोंदणी असलेल्या आणि बारकोड वापरासाठी जीएस १ इंडियाकडे नोंदणीकृत असलेल्या सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांसाठी  ही योजना आहे.

**सहाय्याचे स्वरूप**

बारकोडच्या वापरासाठी नोंदणीशुल्काचा (एकवेळचे व तीन वर्षांनी पुन्हा भरावयाचे) परतावा दिला जातो. एकवेळच्या नोंदणीशुल्काच्या ७५ टक्के रकमेच्या परताव्यासाठी आर्थिक सहाय्य केले जाते. एक जानेवारी २००२ पासून हे सहाय्य केले जाते. तर दरवर्षीसाठीच्या शुल्कापैकी ७५ टक्के रक्कम पहिल्या तीन वर्षांसाठी एक जून २००७ पासून दिले जाते. हे शुल्क बारकोडच्या वापरासाठी सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना जीएस १ इंडियाला देय असते.

# विपणन सहकार्य-सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना सहाय्य (बार कोड)

**योजनेविषयी**

या योजनेअंतर्गत सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना बारकोडच्या वापराबद्दल माहिती दिली जाते व त्यासाठी प्रोत्साहित केले जाते. यासाठी कार्यशाळांचे आयोजन केले जाते तसेच बारकोडिंगसाठीच्या शुल्काचा परतावाही दिला जातो.

**अर्ज कसा कराल**

http://www.gs1india.org या वेबसाइटवरून बारकोडसाठी नोंदणी केल्यानंतर खालीलप्रमाणे शुल्काचा परतावा मिळवता येतो.

बारकोडच्या शुल्काचा परतावा मिळण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज तपशीलवार भरावा.

हा अर्ज एमएसएमई विकास कार्यालयाच्या संचालकांकडून मिळू शकतो अथवा http://www.dcmsme.gov.in या वेबसाइटवरून डाउनलोड करता येऊ शकतो.

पूर्ण भरलेला आणि आवश्यक ती कागदपत्र जोडलेला अर्ज एमएसएमई विकास कार्यालयात सादर करता येईल. एमएसएमई विकास कार्यालयांचे पत्ते http://www.dcmsme.gov.in/contacts येथे पाहता येतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्षमतावृद्धी (११/१६)** | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर) विषयी जनजागृती

**कोण अर्ज करू शकतो**

नोंदणीकृत सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक कंपन्या

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक संघटना उदा. औद्योगिक संघटना, सोसायटया, सहकारी संस्था, विश्वस्त संस्था, स्वयंसेवी संस्था, सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना सहाय्य करणाऱ्या शिक्षणसंस्था व विद्यापीठे

किमान पाच वर्षांचा अनुभव असलेल्या तसेच पथदर्शी प्रकल्प राबवण्यासाठी आवश्यक तांत्रिक व आर्थिक पाठबळ असलेल्या सल्लागार संस्था, संशोधन संस्था, तज्ज्ञ व्यावसायिक किंवा संस्था.

# बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर) विषयी जनजागृती

**सहाय्याचे स्वरूप**

बौद्धिक संपदा हक्कांविषयी माहिती देण्यासाठी जागृतीपर कार्यक्रमांसाठी निधी देणे (सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक संस्था अथवा तज्ज्ञ संस्थांना)

निवडक क्लस्टर्स, उद्योहसमूहांसाठी पथदर्शी अभ्यास प्रकल्प राबवणे. (अर्जदार- सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक संस्था व सक्षम एजन्सीज, तज्ज्ञ संस्था).

कार्यशाळा-चर्चासत्र आयोजित करण्यासाठी अर्थसहाय्य पुरवणे. (अर्जदार- सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक संस्था व तज्ज्ञ संस्था)

# बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर) विषयी जनजागृती

टीआयएफएसी, पेटंट फॅसिलिटेशन सेंटर्स, एनआरडीसी, इंडियन पेटंट ऑफिस, रजिस्ट्रार ऑफ ट्रेडमार्क्स, रजिस्ट्रार ऑफ जॉग्रॉफिकल इंडिकेशन्स, रजिस्ट्रार ऑफ कॉपीराइट्स, मनुष्यबळ विकास (शिक्षण) मंत्रालय, एनआयआयपीएम, लॉ स्कूल्स, आयआयटीज, पेटंट अॅटर्नीज, वैयक्तिक बौद्धिक संपदा हक्क सल्लागार, डब्ल्यूआयपीओ, ईयू-टीआयडीपी, यूएसपीटीओ, केआयपीओ-केआयपीए, आयआयएफटी, डीआयटी, परराष्ट्र मंत्रालय, एमएसएमई मंत्रालय, डीएसआयआर व अन्य तज्ज्ञ संस्था-एजन्सीज.

निमसरकारी अथवा सरकारी अनुदानित संस्था.

खासगी कंपन्या (एमएसएमई संघटनांकडून प्रायोजकत्व असल्यासच)

# बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर) विषयी जनजागृती

**योजनेविषयी**

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांमध्ये बौद्धिक संपदा हक्काविषयी जागृती करणे, त्यांच्या संकल्पना व व्यावसायिक धोरणांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना करणे. बौद्धिक संपदा हक्क तरतुदींचा योग्य वापर केल्यास सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना तंत्रज्ञानाचे अद्ययावतीकरण आणि क्षमता वृद्धिंगत करण्यासाठीही मदत होऊ शकते.

**अर्ज कसा करावा**

यातील प्रत्येक भागासाठी करावयाचा अर्ज आणि मार्गदर्शक सूचना http://www.dcmsme.gov.in/scheme/ipr10.pdf या लिंकवर उपलब्ध आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्षमतावृद्धी (१२/१६)** | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# डिझाइन क्लिनिक फॉर डिझाइन एक्सपर्टाइज फॉर एमएसएमई मॅन्युफॅक्टरिंग सेक्टर

**कोण अर्ज करू शकते**

कार्यशाळा, चर्चासत्र आयोजित करू शकणाऱ्या तज्ज्ञ संस्था-एजन्सीज (औद्योगिक संघटना, तांत्रिक संस्था अथवा अन्य सक्षम संस्था-संघटना)

मुख्य अर्जदाराच्या स्वरूपात सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक किंवा त्यांचा समूह

शैक्षणिक संस्था किंवा डिझाइन कंपन्या किंवा डिझाइन सल्लागार किंवा अन्य. सहअर्जदाराच्या स्वरूपात. मुख्य अर्जदार सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक.

सहअर्जदाराच्या स्वरूपात व्यक्ती. (डिझाइनचा विद्यार्थी) शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने. मुख्य अर्जदार सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक.

**सहाय्याचे स्वरूप**

डिझाइन बद्दल जनजागृती करण्यासाठी कार्यशाळा व चर्चासत्र आयोजित करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे.

डिझाइन प्रकल्प राबविण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे.

# डिझाइन क्लिनिक फॉर डिझाइन एक्सपर्टाइज फॉर एमएसएमई मॅन्युफॅक्टरिंग सेक्टर

प्रत्येक परिसंवाद अथवा चर्चासत्रासाठी केंद्र सरकार ६० हजार रुपये तर प्रत्येक कार्यशाळेसाठी ७५ टक्क्यांपर्यंत (जास्तीत जास्त तीन लाख रुपयांपर्यंत) अनुदान देते.

एका सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकासाठी अथवा एकत्र अर्ज केलेल्या तीनपेक्षा कमी सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकासाठी एकूण मंजूर प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के अथवा ९ लाख रुपये यापैकी जी कमी असेल ती रक्कम अनुदान म्हणून दिली जाते.

एकत्रित अर्ज केलेल्या चार किंवा चारहून अधिक सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांसाठी एकूण मंजूर प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के अथवा १५ लाख रुपये, यापैकी जी कमी असेल ती रक्कम दिली जाते.

या दोन्ही प्रकारात सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना ४० टक्के हिस्सा द्यावा लागतो.

# डिझाइन क्लिनिक फॉर डिझाइन एक्सपर्टाइज फॉर एमएसएमई मॅन्युफॅक्टरिंग सेक्टर

**योजनेबाबत**

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांची स्पर्धात्मकता वाढावी, यासाठी तसेच त्यांना डिझाइनचे महत्त्व समजावे, ते शिकता यावे, यासाठी ही योजना राबविण्यात येते.

**अर्ज कसा करावा**

चर्चासत्र, परिसंवाद किंवा कार्यशाळा घेण्यासाठी तज्ज्ञ, संस्था थेट डिझाइन क्लिनिक सेंटर्समध्ये अर्ज करू शकतात.

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना डिझाइन प्रकल्पासाठीचे अर्ज डिझाइन कंपनीशिवाय किंवा डिझाइन सल्लागार, शैक्षणिक संस्थेसह डिझाइन क्लिनिक सेंटर अथवा इंटरनेटच्या माध्यमातून सादर करता येतील. हा अर्ज http://www.designclinicsmsme.org/ या लिंकवर ऑनलाइन पद्धतीने भरता येईल. किंवा www.dcmsme.gov.in/schemes येथून डाउनलोड करता येईल.

**क्षमतावृद्धी (१३/१६)** व्यवसायविस्तारासाठी सहाय्य कर्जपुरवठा इन्क्युबेशन अन्य

# कौशल्य अद्ययावतीकरण व महिला कॉयर योजना

**कोण अर्ज करू शकते**

काथ्या (कॉयर फायबर) तयार होणाऱ्या ग्रामीण भागातील महिला.

कॉयर इंडस्ट्री (रजिस्ट्रेशन) नियमावली २००८ नुसार कॉयर बोर्डाकडे नोंदणीकृत असलेल्या, संपूर्ण देशातील विभागीय एमएसएमईकडे नोंदणी असलेले व प्रकल्प खर्च दहा लाख रुपयांपेक्षा अधिक असलेल्या किंवा कॉयर उद्यमी योजनेअंतर्गत दिलेल्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक असलेले सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक यासाठी पात्र आहेत.

**सहाय्याचे स्वरूप**

कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याला दरमहा एक हजार रुपये प्रशिक्षण भत्ता दिला जाईल. प्रशिक्षण कार्यक्रम एक महिन्यापेक्षा कमी कालावधीचा असल्यास हा भत्ता विभागून दिला जाईल. तर प्रशिक्षकास दरमहा सहा हजार रुपये मानधन दिले जाईल. या प्रशिक्षणासाठी कच्चा माल, वीजबिल व अन्य अनुषांगिक खर्चासाठी संबंधित प्रशिक्षण संस्थेला प्रतिव्यक्ती प्रतिमहिना चारशे रुपये अर्थसहाय्य केले जाते.

# कौशल्य अद्ययावतीकरण व महिला कॉयर योजना

**योजनेविषयी**

कौशल्य विकास व महिला कॉयर योजना (एमसीवाय) ही पूर्वीच्या कॉयर विकास योजनेअंतर्गत असलेली एक महत्त्वाची योजना आहे. पूर्वी ही योजना कॉयर प्लॅन (जनरल) योजना नावाने ओळखली जात होती. यातून स्थानिक व परदेशी बाजारपेठेचा विकास, कौशल्य विकास व प्रशिक्षण, महिला सक्षमीकरण, रोजगारनिर्मिती-आंत्रप्रेनरशिपला चालना व विकास, कच्च्या मालाचा पुरेपूर वापर, व्यापाराशी निगडित सेवा, काथ्या कामगारांसाठी कल्याणकारी योजना आदींचा समावेश होता. महिला कॉयर योजनेअंतर्गत (एमसीवाय) महिलांचे सक्षमीकरणावर भर देण्यात आला आहे. त्यांना योग्य कौशल्य विकास प्रशिक्षणानंतर सवलतीच्या दरात स्पिनिंग मशिन पुरविण्यात येते.

# कौशल्य अद्ययावतीकरण व महिला कॉयर योजना

**अर्ज कसा करावा**

नॅशनल कॉयर ट्रेनिंग अँड डिझाइन सेंटरमधील प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड वृत्तपत्र तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमातून जाहिरात देऊन अर्ज मागवून तसेच काथ्या उत्पादन करणाऱ्या राज्यातील अधिकाऱ्यांच्या शिफारसींनुसार केली जाते.

प्रादेशिक केंद्रांवरील प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थींची निवड केंद्र संचालकांकडून केली जाते. व्यापारी संघटना, एमएसएमई, उद्योग विभाग, सहकार विभागाकडून पुरस्कृत उमेदवारांची यात निवड केली जाते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्षमतावृद्धी (१४/१६)** | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांसाठी तंत्रज्ञान व दर्जा अद्ययावतीकरण सहाय्य

**कोण अर्ज करू शकते**

पीसीआरए, बीईई, टीईआरआय, आयआयटीज, एनआयटीज आदी तज्ज्ञ संस्था मिटकॉन, जीईडीए सारख्या राज्य सरकारमान्य संस्था सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांचा समूह (क्लस्टर) अथवा औद्योगिक संघटना स्वयंसेवी संस्था अथवा तांत्रिक संस्था

**सहाय्याचे स्वरूप**

ऊर्जा कार्यक्षमता, स्वच्छ विकास (क्लीन डेव्हलपमेंट) तसेच संबंधित तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांच्या क्षमतावृद्धीसाठी मदत करणे. (अर्जदार - जनजागृती कार्यक्रम व मॉडेल डीपीआरसाठी स्वारस्य अभिव्यक्तीमध्ये म्हटल्याप्रमाणे, ऊर्जा लेखापरीक्षणासाठी, डीपीआरसाठी व ईईटी प्रकल्पांसाठी तज्ज्ञ संस्था, सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक समूह)

# सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांसाठी तंत्रज्ञान व दर्जा अद्ययावतीकरण सहाय्य

**योजनेविषयी**

या योजनेद्वारे उत्पादन क्षेत्रातील सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांचा उत्पादन खर्च कमी व्हावा आणि त्यांना पर्यावरणपूरक विकास तंत्र (क्लीन डेव्हलपमेंट मेकॅनिझम) साध्य करता येऊन ऊर्जासक्षम तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

**अर्ज कसा करावा**

बीआयएस अथवा बीईईसारख्या राष्ट्रीय मानांकन संस्था अथवा सीई, यूएल, एएनएसआयसारख्या आंतरराष्ट्रीय मानक संस्थांकडून संबंधित उत्पादनासाठी प्रमाणपत्र मिळवावे.

त्यासाठी आलेल्या खर्चाचा परतावा मिळावा, यासाठी विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. (याचा नमुना जोडपत्र -चारमध्ये दिलेला आहे). हा अर्ज आवश्यक ती कागदपत्रे जोडून संबंधित एमएसएमई विकास विभागाकडे देता येईल.

# सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांसाठी तंत्रज्ञान व दर्जा अद्ययावतीकरण सहाय्य

प्रकल्पाची २५ टक्के रक्कम केंद्र सरकारकडून दिली जाते. उर्वरित रक्कम सिडबी, बँका, वित्त संस्थांकडून उभारावी लागते. तर सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना किमान हिस्सा द्यावा लागतो. कार्बन क्रेडिट ॲक्रिडिशन सेंटर उभारण्यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ७५ टक्के अथवा जास्तीत जास्त १५ लाख रुपयांपर्यंतचे अनुदान दिले जाते.

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना आपल्या उत्पादनाचा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर परवाना काढायचा असल्यास ७५ टक्के अनुदान दिले जाते. केंद्र सरकार एका सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकास राष्ट्रीय स्तरावरील परवाना अथवा मानांकनासाठी जास्तीत जास्त दीड लाख तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानांकनासाठी किंवा परवान्यासाठी जास्तीत जास्त दोन लाख रुपयांपर्यंत सहाय्य करते.

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांमध्ये ऊर्जासक्षम तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करणे. (अर्जदार - नोंदणीकृत सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक युनिट व अंमलबजावणी सिडबीच्या माध्यमातून).

कार्बन क्रेडिट ॲग्रिगेशन सेंटर्सची उभारणी (संघटना, तांत्रिक संस्था व एनर्जी सर्व्हिस कंपन्या)

# सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांसाठी तंत्रज्ञान व दर्जा अद्ययावतीकरण सहाय्य

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना उत्पादन प्रमाणपत्र तसेच राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय संस्थांकडून परवाना घेण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.

एका जनजागृतीपर कार्यक्रमासाठी ७५ टक्के जास्तीत जास्त ७५ हजार रुपयांपर्यंतचे सहाय्य केले जाते.

क्लस्टर पातळीवरील एनर्जी ऑडिटसाठी व मॉडेल डीपीआर तयार करण्यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ७५ टक्क्यांपर्यंत सहाय्य केले जाते.

ईएफटी प्रकल्पांसाठी वैयक्तिक सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना सर्वंकष प्रकल्प आराखडा अर्थात डीपीआर तयार करण्यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के अथवा जास्तीत जास्त दीड लाख रुपयांपर्यंत सहाय्य केले जाते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्षमतावृद्धी (१५/१६)** | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# उत्पादन सुविधांचा विकास (डीपीआय)

**कोण अर्ज करू शकतो**

कॉयर इंडस्ट्री (रजिस्ट्रेशन) नियमावली २००८ नुसार कॉयर बोर्डाकडे नोंदणीकृत असलेल्या, संपूर्ण देशातील विभागीय एमएसएमईकडे नोंदणी असलेल्या एमएसएमई व प्रकल्प खर्च दहा लाख रुपयांपेक्षा अधिक असलेल्या किंवा कॉयर उद्यमी योजनेअंतर्गत दिलेल्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या एमएसएमईज यासाठी पात्र आहेत.

**सहाय्याचे स्वरूप**

उत्पादन सुविधा विकास योजनेअंतर्गत दहा लाख रुपयांपर्यंतचे कॉयर केंद्र उभारण्यासाठी कॉयर बोर्डाकडून अर्थसहाय्य केले जाते. डि-फायबरिंग युनिट उभारण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के किंवा जास्तीत जास्त सहा लाख रुपयांपर्यंत, स्वयंचलित स्पिनिंग युनिटसाठी चार लाख रुपयांपर्यंत व कॉयर पिथ युनिट व अन्य बाबींसाठी पाच लाख रुपयांपर्यंत अर्थसहाय्य केले जाते. संमिश्र प्रकल्प किंवा एकापेक्षा अधिक युनिट्ससाठी जास्तीतजास्त नऊ लाख रुपयांपर्यंत अर्थसहाय्य केले जाते. अनुदानाची रक्कम निश्चित करताना,डि-फायबरिंग व कॉयर पिथ युनिटसाठी इमारतीचा खर्च जास्तीत जास्त आठ लाख रुपये व स्वयंचलित स्पिनिंग युनिटसह अन्य बाबींसाठी सहा लाख रुपयांपर्यंत धरला जातो.

# उत्पादन सुविधांचा विकास (डीपीआय)

**योजनेविषयी**

काथ्या उत्पादन केंद्रांना अत्याधुनिक पायाभूत सुविधा पुरविण्याच्या हेतूने काथ्या मंडळाने डेव्हलपमेंट ऑफ प्रॉडक्शन इन्फ्रास्ट्रक्चर ही योजना सुरू केली आहे. यातून या उद्योजकांची उत्पादकतेत वाढ, दर्जामध्ये सुधारणा आणि ग्रामीण भागात रोजगार संधींमध्ये वाढ झाल्याचे समोर आले आहे. या योजनेच्या माध्यमातून अत्याधुनिक काथ्या प्रक्रिया केंद्रांची उभारणी, काथ्या प्रक्रिया केंद्र उभारणीची क्षमता असलेल्या भागात काथ्या उद्योगाचा प्रसार, उपलब्ध कच्च्या मालाचा सुयोग्य वापर, विद्यमान केंद्रांचे आधुनिकीकरण, युवकांना काथ्या उद्योगाकडे वळविणे, अधिक किमतीच्या ग्राहककेंद्री उत्पादनांची निर्मिती, काथ्या उद्योगाची स्पर्धात्मकता वाढविणे, पर्यावरणपूरक उत्पादन तंत्रज्ञानाचा अवलंब, तांत्रिक सुधारणांच्या माध्यमातून काथ्या उद्योगाला प्रदूषणमुक्त उद्योग बनविणे ही या योजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

# उत्पादन सुविधांचा विकास (डीपीआय)

**अर्ज कसा कराल**

संबंधित उद्योजकांनी नव्या उत्पादन केंद्रासाठी आर्थिक अनुदान मिळावे यासाठी नवे उत्पादन केंद्र सुरू झाल्याच्या सहा महिन्यांच्या आत विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. उत्पादन सुरू झाल्याची तारीख एमएसएमई विकास आयुक्तालयाच्या सरव्यवस्थापकांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्षमतावृद्धी (१६/१६)** | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# पारंपरिक उद्योगांच्या पुनरूज्जीवनासाठी निधी देण्याबाबत सुधारित योजना (स्फूर्ती)

**कोण अर्ज करू शकते**

समूह विकासासंबंधीचे (क्लस्टर डेव्हलपमेंट) ज्ञान व अनुभव असलेल्या स्वयंसेवी संस्था, केंद्र व राज्य सरकारी संस्था, निमशासकीय संस्था, केंद्र, राज्य तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी व अन्य.

**सहाय्याचे स्वरूप**

या योजनेअंतर्गत तीन प्रकारे सहाय्य केले जाते. **सॉफ्ट इंटरव्हेन्शन्स, हार्ड इंटरव्हेन्शन्स आणि थिमॅटिक इंटरव्हेन्शन्स** असे हे तीन प्रकार आहेत. त्यात खालील पद्धतीने सहाय्य केले जाते.

हेरिटेज क्लस्टर (एक हजार ते अडीच हजार कारागीर) - आठ कोटी रुपये

मेजर क्लस्टर (५०० ते १००० कारागीर) - तीन कोटी रुपये

मिनी क्लस्टर (५०० कारागिरांपर्यंत) - दीड कोटी रुपये

ईशान्य भारत व जम्मू काश्मीर तसेच थंड हवेच्या ठिकाणी कारागिरांच्या संख्येत निम्मी घट लागू आहे.

# पारंपरिक उद्योगांच्या पुनरूज्जीवनासाठी निधी देण्याबाबत सुधारित योजना (स्फूर्ती)

छोट्या स्तरावरील बदल घडविणे (सॉफ्ट इंटरव्हेन्शन्स) - जास्तीत जास्त २५ लाख रुपयांपर्यंत (योजनेअंतर्गत १०० टक्के अनुदान). व्यापक बदल घडविणे (हार्ड इंटरव्हेन्शन्स) - प्रकल्पाच्या गरजेनुसार (७५ टक्क्यांपर्यंत अनुदान). तांत्रिक एजन्सीसाठीच्या खर्चासाठी सॉफ्ट व हार्ड इंटरव्हेन्शनच्या आठ टक्के (१०० टक्के अनुदान). अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सी अथवा क्लस्टर अधिकाऱ्यासाठी जास्तीत जास्त २० लाख रुपये (१०० टक्के अनुदान )

**योजनेविषयी**

या योजनेची काही प्रमुख उद्दिष्टे

- पारंपरिक उद्योग व कारागिरांना एकत्र आणून त्यांचा समूह बनवणे व त्याद्वारे त्यांना स्पर्धात्मक बनवून त्यांना दीर्घकाळ शाश्वत व्यवसायासाठी सहकार्य करणे.
- ग्रामीण व्यावसायिक तसेच पारंपरिक उद्योगातील कारागिरांना शाश्वत रोजगार संधी मिळवून देणे.अशा क्लस्टर्समधून तयार होणाऱ्या उत्पादनांची विक्रीक्षमता (मार्केटॅबिलिटी) वाढवणे. नव्या उत्पादनांना प्रोत्साहन पाठिंबा देणे, डिझाइनिंगसाठी मदत करणे, पॅकेजिंग सुधारणे तसेच विपणन व्यवस्थेत आवश्यक त्या सुधारणा करणे.

# पारंपरिक उद्योगांच्या पुनरूज्जीवनासाठी निधी देण्याबाबत सुधारित योजना (स्फूर्ती)

- क्लस्टरशी निगडित पारंपरिक कारागिरांना त्यांचे कौशल्य व क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी प्रशिक्षण देणे तसेच त्यांच्यासाठी अभ्यासदौरे आयोजित करणे.
- कारागिरांसाठी सामायिक सुविधा तसेच अत्याधुनिक साधने, उपकरणांची सोय करणे.
- सर्व भागधारकांच्या सहभागातून क्लस्टरची प्रशासन व्यवस्था अधिक भक्कम करणे. त्याद्वारे त्यांना भविष्यातील आव्हाने व संधींची माहिती मिळून त्याला तोंड देण्यासाठी तयार राहतील.
- पारंपरिक तसेच नव्या कौशल्यांचा विकास करून, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, आधुनिक प्रक्रियांचा अवलंब करून, बाजारपेठेची अचूक माहिती व सार्वजनिक खासगी भागीदारीचा अवलंब करणे. ज्याद्वारे अशा प्रकारच्या आधुनिक परंतु पारंपरिक उद्योगांच्या क्लस्टर्सची अन्यत्र नव्याने उभारणी करता येईल.

**अर्ज कसा करावा**

वरीलप्रमाणे पात्र एजन्सी अथवा संस्थांनी आपला अर्ज राज्याच्या खादी व ग्रामोद्योग विभाग आयुक्तालयाकडे (केव्हीआयसी) सादर करावा. राज्य पातळीवर व विभागीय पातळीवर त्याची छाननी होईल व त्यानंतर हा अर्ज सुकाणू समितीकडे अंतिम मान्यतेसाठी जाईल.

# ब) व्यवसाय विकास आधार योजना

१) आंतरराष्ट्रीय सहकार्य........................................................................... ७४
२) खरेदी व विपणन आधार योजना............................................................. ७७
३) एमएसएमई बाजारपेठ विकास सहाय्य (एमडीए) ............................................. ८१
४) एकल केंद्र नोंदणी (एनएसआयसी) ............................................................ ८४
५) माहितीसाठी मध्यस्थी सेवा.................................................................... ८८
६) विपणन ज्ञान सेवा पुरवठा ..................................................................... ९२
७) कॉयर विकास योजना निर्यात प्रोत्साहन....................................................... ९६
८) कॉयर विकास योजना बाजारपेठ प्रोत्साहन योजना......................................... ९९

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | **व्यवसायविस्तारासाठी सहाय्य (१/८)** | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# आंतरराष्ट्रीय सहकार्य

**कोण अर्ज करू शकते**

राज्य व केंद्र सरकारी संस्था

औद्योगिक संघटना किंवा उद्योग संस्था

नोंदणीकृत सोसायटी,विश्वस्त संस्था, सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांच्या विकासाशी व प्रोत्साहनाशी संबंधित संस्था.

**सहाय्याचे स्वरूप**

या योजनेअंतर्गत संबंधित आंत्रप्रेनरच्या हवाई प्रवास शुल्काच्या व निवास व्यवस्थेसाठीच्या खर्चाच्या ९५ टक्क्यांपर्यंतचे आर्थिक सहाय्य दिले जाते. मालवाहतूक व विमा, स्थानिक वाहतूक व्यवस्था, सेक्रेटरी अथवा दळणवळण सेवा, सामायिक माहितीपत्रकाची छपाई अशा सामायिक स्वरूपाच्या खर्चासाठीही अर्थसहाय्य दिले जाते.

# आंतरराष्ट्रीय सहकार्य

**योजनेविषयी**

या योजनेत खालील बाबींचा समावेश होतो.

परकीय सहकार्य, सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांसाठी बाजारपेठांचा विस्तार, नव्या भागीदारांचा शोध व सहकार्य, नवतंत्रज्ञानाचा अवलंब किंवा अद्ययावतीकरणासाठी सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांच्या गटाला परदेश दौऱ्यासाठी सहाय्य.

भारतीय एमएसएमईजना आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग आहे, अशा  प्रदर्शन, विक्री महोत्सव, विक्रेता-उत्पादक भेटींसाठी भारतात अथवा परदेशात सहभागी होण्याची संधी देणे.

एमएसएमईजसंदर्भातील उपयुक्त व महत्त्वाच्या विषयांवर आंतरराष्ट्रीय परिषदा व चर्चासत्रांचे आयोजन करणे.

**अर्ज कसा करावा**

यासाठी ऑनलाइन अर्ज करता येईल. किंवा आपले अर्ज विहित नमुन्यात संचालक (आंतरराष्ट्रीय सहकार्य), एमएसएमई मंत्रालय, उद्योग भवन, नवी दिल्ली ११००११ या पत्त्यावर पाठवावेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | **व्यवसायविस्तारासाठी सहाय्य (२/८)** | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# खरेदी आणि विपणन आधार योजना

**कोण अर्ज करू शकते**
उद्योग आधार मेमोरेंडमवर नोंदणी केलेली उत्पादन किंवा सेवा क्षेत्रातील एमएसएमई.

**सहाय्याचे स्वरूप**
भारतातील विक्री महोत्सव किंवा प्रदर्शनात सहभाग घेण्यासाठी आर्थिक सहाय्य.
स्थानिक विक्री महोत्सव किंवा प्रदर्शनाचे आयोजन करणे. किंवा एमएसएमई मंत्रालय अथवा एमएसएमई विकास आयुक्तांच्या कार्यालयामार्फत अथवा सरकारी संस्थांद्वारे आयोजित विक्री महोत्सव अथवा प्रदर्शनात सहभाग.
आधुनिक पॅकेजिंग तंत्रज्ञानाद्वारे एमएसएमईजची क्षमतावृद्धी करणे
व्यावसायिकांची क्षमता वृद्धी.

# खरेदी आणि विपणन आधार योजना

**योजनेविषयी**
या योजनेअंतर्गत खालील उपक्रमांसाठी सहाय्य केले जाते.
राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय विक्री महोत्सव, प्रदर्शन, एमएसएमई एक्स्पो आयोजित करणे किंवा त्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे.
एमएसएमईजना मार्केटिंगमधील पॅकेजिंगचे महत्त्व, पॅकेजिंगमधील प्रगत तंत्रज्ञान, आयात-निर्यात धोरण व प्रक्रिया, जीईएम पोर्टल, एमएसएमई परिषदा, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय व्यापारातील ताज्या घडामोडी, व मार्केटिंगशी संबंधित अन्य बाबी याविषयी माहिती देणे व जागृती करणे.
विक्री महोत्सव, डिजिटल जाहिराती, ई-मार्केटिंग, जीएसटी, जीईएम पोर्टल, पब्लिक प्रोक्युअरमेंट पॉलिसी व संबंधित बाबींविषयी जागृती करणे.

# खरेदी आणि विपणन आधार योजना

**अर्ज कसा करावा**

संबंधित उद्योजकांना एमएसएमई विकास आयुक्तालयाकडे किंवा एमएसएमएई मंत्रालयाकडे किंवा अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांमार्फत किंवा उपलब्ध यंत्रणेमार्फत विक्री महोत्सव अथवा प्रदर्शन सुरू होण्याआधी पुरेशा कालावधीत (सुमारे एक महिना आधी) अर्ज सादर करावा.

**व्हिडिओ लिंक**

या योजनेचा लाभ घेतलेल्या उद्योजकांचे अनुभव ऐका या लिंकवर

https://youtube.be/Abulu2ALr40

https://youtube.be/hBITPVIjipq

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | **व्यवसायविस्तारासाठी सहाय्य (३/८)** | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# निर्यातदार सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांसाठी बाजारपेठ विस्तार साहाय्य

**कोण अर्ज करू शकते**
वैयक्तिक सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक व औद्योगिक संघटना

**सहाय्याचे स्वरूप**
केंद्र सरकारतर्फे सर्वसाधारण (जनरल) संवर्गातील उद्योजकाला इकॉनॉमी श्रेणीतील हवाई प्रवास भाड्याच्या ७५ टक्के व प्रदर्शनातील जागेच्या भाड्यापैकी ५० टक्के रक्कम परतावा स्वरूपात दिली जाते.
महिला अथवा एससी किंवा एसटी संवर्गातील तसेच ईशान्य भारतातील उद्योजकांना इकॉनॉमी दर्जाच्या विमानप्रवासाचे तसेच प्रदर्शनातील जागेच्या भाड्याचा संपूर्ण परतावा दिला जातो.
हवाई प्रवासाचे भाडे व प्रदर्शनातील जागेचे भाडे यासाठी एका उद्योगासाठी जास्तीत जास्त एक लाख २५ हजार रुपयांपर्यंतचाच परतावा दिला जातो.

# निर्यातदार सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांसाठी बाजारपेठ विस्तार साहाय्य

**योजनेविषयी**

ही योजना खालील गोष्टींसाठी लाभदायक ठरते.

सूक्ष्म व लघु उद्योजक निर्यातदारांना परदेशातील ग्राहक व बाजारपेठ मिळविण्याच्या प्रयत्नांसाठी प्रोत्साहित करणे.

आंतरराष्ट्रीय विक्री महोत्सव-प्रदर्शनात एमएसएमई इंडिया अंतर्गत भारतीय सूक्ष्म व लघु उद्योगांचा सहभाग वाढवणे.

भारतीय सूक्ष्म व मध्यम उद्योगांकडून होणारी निर्यात वाढवणे.

बारकोडच्या वापराला प्रोत्साहन देणे.

**अर्ज कसा करावा**

पात्रता निकष पूर्ण करणारे उद्योजक त्यांचे अर्ज एमएसएमई विकास संस्थांच्या मार्फत एमएसएमई विकास आयुक्तालयाकडे पाठवू शकतात.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | **व्यवसायविस्तारासाठी सहाय्य (४/८)** | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# एकलकेंद्री नोंदणी योजना (सिंगल पॉइंट रजिस्ट्रेशन)

**कोण अर्ज करू शकतो**

उद्योग संचालक अथवा जिल्हा उद्योग केंद्राकडे नोंदणी असलेले उत्पादन अथवा सेवा क्षेत्रातील सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योजक किंवा ज्यांच्याकडे उद्योग आधार आहे, असे उद्योजक या योजनेअंतर्गत एनएसआयसीकडे नोंदणी करण्यास पात्र आहेत.

व्यावसायिक उत्पादनाला सुरूवात केलेले परंतु, एक वर्ष पूर्ण न झालेल्या सूक्ष्म व लघु उद्योगांना या योजनेअंतर्गत पाच लाख रुपयांपर्यंतच्या मर्यादेसह तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र मिळू शकते. हे प्रमाणपत्र जारी केल्यानंतर एक वर्ष वैध असते. त्यासाठी नोंदणीशुल्क व आवश्यक कागदपत्र सादर करावी लागतात.

# एकलकेंद्री नोंदणी योजना (सिंगल पॉइंट रजिस्ट्रेशन)

**सहाय्याचे स्वरूप**

या योजनेअंतर्गत नोंदणी केलेल्या सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना खालील लाभ मिळतात.

निविदा संच (टेंडर सेट्स) मोफत उपलब्ध होतात.

बयाणा रक्कम (अर्नेस्ट मनी) भरण्यापासून सूट.

निविदा प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना एल वन + १५ टक्के किंमत पट्ट्यात बोली लावता येते. (त्यासाठी आवश्यकतेच्या २० टक्के भाग एल वन किंमतीने पुरवावा लागतो. एल वन हा सूक्ष्म-लघु उद्योगक्षेत्रातील नसावा.)

प्रत्येक केंद्रीय मंत्रालय, विभाग तसेच सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांनी वस्तू व सेवांच्या वार्षिक खरेदीच्या किमान २० टक्के खरेदी ही सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांच्या माध्यमातूनच करावी, असे ध्येय निश्चित करावे. या २० टक्के खरेदीपैकी ४ टक्के खरेदी ही अनुसूचित जाती व जमाती संवर्गातील (एससी, एसटी) उद्योजकांकडून करणे बंधनकारक आहे.

# एकलकेंद्री नोंदणी योजना (सिंगल पॉइंट रजिस्ट्रेशन)

**योजनेविषयी**

सरकार विविध प्रकारच्या वस्तू व मालाची खरेदी करणारा सर्वात मोठा खरेदीदार असते. सरकारने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांकडून खरेदीचे प्रमाण वाढविल्यानंतर गव्हर्नमेंट स्टोअर्स परचेस प्रोग्रॅम सुरू करण्यात आला. एनएसआयसीतर्फे सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांची एकलकेंद्री नोंदणी योजनेअंतर्गत (सिंगल पॉइंट रजिस्ट्रेशन स्कीम) नोंदणी केली जाते. व असेच उद्योजक सरकारी खरेदीप्रक्रियेत सहभागी होऊ शकतात.

**अर्ज कसा करावा**

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक www.nsicpronline.com या लिंकवरून ऑनलाइन पद्धतीने किंवा एनएसआयसीच्या विभागीय कार्यालय किंवा शाखेतून विहित नमुन्यातील अर्ज घेऊन तो भरू शकतात. या अर्जावरच अटी-शर्तींचाही उल्लेख असतो. हा अर्ज मोफत उपलब्ध आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | **व्यवसायविस्तारासाठी सहाय्य (५/८)** | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# इन्फोमीडियारी सर्व्हिसेस

**कोण अर्ज करू शकते**
उद्योजक

**सहाय्याचे स्वरूप**
१) गोल्ड सभासदत्व
व्यवसाय ते व्यवसाय (बीटूबी) किंवा व्यवसाय ते ग्राहक (बीटूसी) साठीच्या पोर्टलसाठी नोंदणी करतील, त्यांनाच त्यांच्या पसंतीने कोणत्याही एका पोर्टलवर दहा उत्पादनांचे फोटो अपलोड करता येतील.
प्रथम नोंदणी शुल्क - पाच हजार रुपये व जीएसटी - एक वर्षासाठी
नूतनीकरण शुल्क - पाच हजार रुपये व जीएसटी - एका वर्षासाठी
आंतरराष्ट्रीय ग्राहकांसाठी - १२५ अमेरिकन डॉलर प्रतिवर्ष.
२) सर्वसाधारण सभासदत्व
मोफत, बीटूबी पोर्टलला मर्यादित ॲक्सेस उपलब्ध.

# इन्फोमीडियारी सर्व्हिसेस

३) प्लॅटिनम सभासदत्व बीटूबी व बीटूसी अशा दोन्ही पोर्टलवर सहभागी होणाऱ्या सदस्यांना दोन्ही पोर्टलच्या सर्व सुविधांचा अमर्याद वापर करता येतो तसेच त्यांना त्यांच्या दहा उत्पादनांचे फोटो अपलोड करता येतात.
नोंदणीशुल्क दहा हजार रुपये व कर (एका वर्षासाठी)
नूतनीकरण शुल्क - दहा हजार रुपये व कर
आंतरराष्ट्रीय ग्राहकांसाठी २५० अमेरिकन डॉलर

**योजनेविषयी**
नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन (एनएसआयसी) - राष्ट्रीय लघुद्योग महामंडळातर्फे सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांची माहिती पुरविण्याची (इन्फोमीडियारी) सेवा पुरविण्यात येते. याद्वारे भारतातील सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांच्या क्षमतांचे दर्शन घडतेच परंतु, एकाच ठिकाणी एकाच वेळी व्यवसाय, तंत्रज्ञान, वित्तपुरवठा याविषयीची माहितीही उपलब्ध होते. महामंडळातर्फे www.msmemart.com या एमएसएमई ग्लोबल मार्ट या बीटूबी व बीटूसी वेब पोर्टलच्या माध्यमातून ही सेवा पुरवली जाते. या सेवा वार्षिक सभासदत्वाच्या तत्वावर दिल्या जातात.

# इन्फोमीडियारी सर्व्हिसेस

**अर्ज कसा करावा**

नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन (एनएसआयसी) वेबसाइटवरून अर्ज डाउनलोड करावा.

याच वेबसाइटवरून इन्फोमीडियारी सर्व्हिसेस मेंबरशिपसाठीची विनंतीही (रिक्वेस्ट) डाउनलोड करावी.

हा अर्ज पूर्णपणे भरून आवश्यक ती कागदपत्रे जोडून खालील पत्त्यावर पाठवावा.

टेक्नोलॉजी इन्फोमीडियारी सर्व्हिसेस व डेटा सेंटर (टीआयएसडीसी)
नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन लिमिटेड, एनएसआयसी भवन,
ओखला इंडस्ट्रियल इस्टेट, नवी दिल्ली - ११००२० .

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | **व्यवसायविस्तारासाठी सहाय्य (६/८)** | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# मार्केटिंग इंटलिजन्स सर्व्हिसेस लीज

**कोण अर्ज करू शकते**

व्यावसायिक सहकार्याच्या शोधात असलेले, किंवा सामायिक उत्पादन संधीच्या शोधात असलेले, भागीदारी व्यवसाय करू इच्छिणारे, आयात निर्यातदार व तंत्रज्ञान हस्तांतरणाच्या शोधात असलेले सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक उद्योजक या योजनेचे संभाव्य लाभार्थी ठरू शकतात.

सरकारच्या विविध विभागांच्या व सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या रेट कॉन्ट्रॅक्टसचा माहितीसाठा (डेटाबेस).

सरकारचे विविध विभागांनी व सार्वजनिक कंपन्यांनी काढलेल्या निविदांची (टेंडर्स) माहिती.

विविध देशांमध्ये निर्यात करणाऱ्या भारतीय निर्यातदारांचा, उत्पादनांचा माहितीसाठा (डेटाबेस).

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांसाठी तंत्रज्ञान पुरवठादार व प्रकल्पांचा माहितीसाठा (डेटाबेस).

व्यावसायिक भागीदारांची गाठ-भेट (परकीय शिष्टमंडळ व भारतीय निर्यातदारांच्या समक्ष भेटीची व्यवस्था).

# मार्केटिंग इंटलिजन्स सर्व्हिसेस लीज

**सहाय्याचे स्वरूप**
ऑनलाइन विनंती अर्ज भरणे - एनएसआयसीतर्फे दिल्या जाणाऱ्या मार्केटिंग इंटलिजन्स सर्व्हिसेसचा लाभ घेण्यास इच्छुक सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक खालील बाबींसाठी अर्ज करू शकतात. सरकारी, सार्वजनिक उपक्रम आणि खासगी क्षेत्रासाठी घाऊक खरेदीदार, निर्यातदार, आंतरराष्ट्रीय खरेदीदार.

**योजनेविषयी**
बाजारपेठेविषयी अद्ययावत माहिती मिळविण्यासाठी एनएसआयसीचा मार्केटिंग इंटलिजन्स विभाग विद्यमान व संभाव्य ग्राहकांकडून माहिती मिळवून त्याचे पृथ्थकरण करून त्याद्वारे बाजारपेठांची स्थिती, सध्याच्या व भविष्यातील गरजा, प्राथमिकता, स्वरूप आदीची माहिती घेऊन बाजारपेठेवर परिणाम करू शकणाऱ्या व्यावसायिक वातावरणातील संभाव्य बदलांचा अंदाज बांधण्याचा प्रयत्न करतो. यात खालील बाबींचा समावेश असतो.

# मार्केटिंग इंटलिजन्स सर्व्हिसेस लीज

घाऊक खरेदीदारांचा माहितीसाठी (डेटाबेस) उत्पादनाच्या यादीसह.
सरकारी व सार्वजनिक उपक्रमांमधील खरेदीदार. तंत्रज्ञान पुरवठादार.
एनएसआयसीमध्ये एकलकेंद्री नोंदणी योजनेअंतर्गत (सिंगल पॉइंट रजिस्ट्रेशन) नोंदणीकृत सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक.
डायरेक्टर जनरल ऑफ सप्लाईज अँड गुड्स (डीजीएस अँड डी) कडे नोंदणीकृत पुरवठादार

**अर्ज कसा करावा**

अर्ज मागवणे व पूर्ण भरून पाठविण्यासाठीचा पत्ता
मार्केटिंग इंटलिजन्स सेल, ब्लॉक एफ, एनटीएससी कॉम्प्लेक्स, एनएसआयसी,
ओखला इंडस्ट्रियल इस्टेट, नवी दिल्ली
दूरध्वनी - +91-11-26382047, 64650781,64651703
Email : mic@nsic.co.in, managermic@nsic.co.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | **व्यवसायविस्तारासाठी सहाय्य (७/८)** | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# काथ्या (कॉयर) योजना निर्यात बाजारपेठ विस्तार (प्रमोशन)

**कोण अर्ज करू शकतात**

काथ्या उत्पादक, उद्योजक व निर्यातदार, शिखर सोसायट्या, केंद्रीय सहकारी सोसायट्या, प्राथमिक सहकारी सोसायट्या, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, काथ्या मंडळाची (कॉयर बोर्ड) दालने व विक्री केंद्र

**सहाय्याचे स्वरूप**

- शिष्टमंडळ, सल्ला व माहिती मिळवणे.
- परिषदा व कार्यशाळांमध्ये सहभाग.
- आंतरराष्ट्रीय विक्री महोत्सव-विक्रेते-ग्राहक भेटींमध्ये सहभाग
- परदेशात प्रचार-प्रसिद्धी.
- परदेशातील बाजारपेठ विस्तारासाठी सहाय्य
- काथ्या उद्योगांसाठी पारितोषिके.

# काथ्या (कॉयर) योजना निर्यात बाजारपेठ विस्तार (प्रमोशन)

**योजनेविषयी**

काथ्या अर्थात कॉयर उद्योग कायदा १९५३, अंतर्गत स्थानिक बाजारपेठेचा विस्तार हेच मुख्य उद्दिष्ट होते. याच योजनेअंतर्गत काथ्या मंडळ (कॉयर बोर्ड) काथ्या व काथ्याची उत्पादने लोकप्रिय करणे आणि स्थानिक बाजारपेठेचा विस्तार करण्यासाठी काम करते. मंडळातर्फे खालील उपक्रमही राबवले जातात.

-विक्री केंद्र व डेपोंची उभारणी व देखभाल

-स्थानिक (देशांतर्गत) प्रदर्शनात सहभाग

**अर्ज कसा करावा**

यासाठीचा अर्ज कॉयर बोर्डाच्या मुख्यालयाकडून मिळवता येईल किंवा त्यांच्या वेबसाइटवरून डाउनलोडदेखील करता येईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | **व्यवसायविस्तारासाठी सहाय्य (८/८)** | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | अन्य |

# काथ्या (कॉयर) विकास योजना स्थानिक विस्तार योजना

**कोण अर्ज करू शकते**

शिखर (अॅपेक्स) सोसायट्या, केंद्रीय सहकारी सोसायट्या, प्राथमिक सहकारी सोसायट्या, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, कॉयर बोर्डाची विक्री दालने व डेपो.

**सहाय्याचे स्वरूप**

या योजनेअंतर्गत शिखर (अॅपेक्स) सोसायट्या, केंद्रीय सहकारी सोसायट्या, प्राथमिक सहकारी सोसायट्या, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, कॉयर बोर्डाची विक्री दालने व डेपो यांना आर्थिक सहाय्य केले जाते. बाजारपेठ विस्तारासाठी (एमडीए) त्यांच्या काथ्या उत्पादनांच्या, सुतळी (कॉयर यार्न) व रबराईज्ड कॉयर उत्पादनांच्या मागील तीन आर्थिक वर्षांमधील सरासरी वार्षिक विक्रीच्या दहा टक्के रक्कम दिली जाते. हे अनुदान केंद्र व राज्य सरकार समप्रमाणात (एकास एक) देते. केंद्राकडून मिळणारे अनुदान हे संबंधित योजनेअंतर्गत काथ्या मंडळासाठी निश्चित केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदींवर अवलंबून असते.

# काथ्या (कॉयर) विकास योजना स्थानिक विस्तार योजना

**योजनेविषयी**

काथ्या उद्योग कायदा १९५३ अंतर्गत स्थानिक बाजारपेठेचा विस्तार हे या योजनेचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत काथ्या मंडळ काथ्या व काथ्या उत्पादनांची लोकप्रियता वाढविण्यासाठी आणि स्थानिक बाजारपेठेचा विस्तार करण्यासाठी विविध उपक्रम राबवते. यातील काही प्रमुख उपक्रम याप्रमाणे.

- मंडळाची विक्री केंद्र व डेपोंची उभारणी व देखभाल
-देशांतर्गत प्रदर्शनांमध्ये सहभाग

**अर्ज कसा कराल**

स्थानिक बाजारपेठ विस्तारासाठीचा अर्ज काथ्या मंडळाच्या मुख्यालयाकडून मागवता येईल किंवा त्यांच्या वेबसाइटवरून डाउनलोडही करता येईल.

# क) कर्ज व आर्थिक सहाय्य

१) तांत्रिक अद्ययावतीकरणासाठी भांडवली अनुदान कर्ज.............................................. १०३
२) कर्ज हमी निधी योजना............................................................................ १०७
३) कामगिरी व कर्ज मानांकन...................................................................... १११
४) बिल डिस्काउंटिंग.................................................................................... ११५
५) सूक्ष्म अर्थसाहाय्य योजना........................................................................ ११७
६) बँक कर्ज सहकार्य.................................................................................... १२०
७) पंतप्रधान रोजगार निर्माण योजना ............................................................ १२३

# तांत्रिक अद्ययावतीकरणासाठी भांडवली अनुदान कर्ज

**कोण अर्ज करू शकते**

स्वतःच्या मालकीचा व्यवसाय असणारे उद्योजक, भागीदार, सहकारी सोसायट्या, छोट्या व मध्यम स्वरूपाच्या खासगी व सार्वजनिक कंपन्या.

**सहकार्याचे स्वरूप**

या सुधारित योजनेद्वारे सूक्ष्म्, खादी, ग्रामीण व काथ्या औद्योगिक युनिट्सना तांत्रिक अद्ययावतीकरणासाठी १५ टक्के (जास्तीत जास्त एक कोटी रुपये) भांडवली अनुदान दिले जाते. हे अनुदान त्यांना संबंधित क्षेत्रासाठी, उत्पादनासाठी सर्वमान्य आधुनिक तंत्रज्ञानाच्या अवलंबासाठी संस्थात्मक पद्धतीने घेतलेल्या कर्जावर दिले जाते. या योजनेअंतर्गत सध्या वापरात असलेले तंत्रज्ञान किंवा यंत्रणा बदलून नवे तंत्रज्ञान अथवा यंत्रणा बसविण्यास परवानगी नाही. त्याचबरोबर जी युनिट्स पूर्वी वापरलेली अद्ययावत यंत्रणा बसविण्याच्या विचारात असतील, त्यांनाही या योजनेअंतर्गत अनुदानासाठी मान्यता मिळत नाही. महिला आंत्रप्रेनर्सना ही योजना लागू आहे.

# तांत्रिक अद्ययावतीकरणासाठी भांडवली अनुदान कर्ज

**योजनेविषयी**

तंत्रज्ञान अद्ययावतीकरण म्हणजे अत्याधुनिक यंत्रणेचा, तंत्रज्ञानाचा अवलंब करणे. तंत्रज्ञान अद्ययावतीकरण म्हणजे सध्याच्या तंत्रज्ञानाऐवजी अधिक उत्तम व उत्पादन क्षमता, उत्पादनाचा दर्जा, उत्पादन केंद्रातील परिस्थिती व वातावरणामध्ये सुधारणा घडवून आणणाऱ्या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी उचललेले महत्त्वाचे पाऊल. यामध्ये आधुनिक पॅकेजिंग तंत्रज्ञान, प्रदूषण कमी करण्यासाठीचे उपाय, ऊर्जाबचतीसाठीची यंत्रणा बसविण्याचाही यात समावेश होतो. त्याचबरोबर उत्पादन केंद्रातच चाचणी (इन हाऊस टेस्टिंग) व ऑनलाइन क्वालिटी कंट्रोल यंत्रणा बसविण्यासाठी गरज असलेल्या एमएसएमईजही तंत्रज्ञान अद्यायवीकरणाअंतर्गत या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

# तांत्रिक अद्ययावतीकरणासाठी भांडवली अनुदान कर्ज

**अर्ज कसा करावा**

पात्रता निकष पूर्ण करणारे उद्योजक शेड्यूल व्यापारी (कमर्शियल) बँकेकडे कर्जासाठी अर्ज करू शकतात. शेड्यूल व्यापारी बँकांमध्ये सिडबीने तांत्रिक अद्ययावतीकरण निधी (टीयूएफ) योजनेअंतर्गत मान्यता दिलेल्या नागरी सहकारी बँका, विभागीय ग्रामीण बँका (आरआरबी), राज्य वित्त महामंडळ (एसएफसी) आणि ईशान्य विकास वित्तसंस्था (एनईडीएफआय) यांचा यात समावेश होतो.

**व्हिडिओ लिंक्स**

या योजनेचा लाभ घेतलेल्या काही उद्योजकांचे अनुभव या व्हिडिओत पाहता येतील.

https://youtu.be/-NEP0K6XVLg

https://youtu.be/-N5X9NPONfo

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | **कर्जपुरवठा (२/७)** | इन्क्युबेशन | अन्य |

# कर्ज हमी निधी योजना

**कोण अर्ज करू शकतो**

नवे व जुने उद्योजक अर्ज करू शकतात.

**सहाय्याचे स्वरूप**

या योजनेअंतर्गत प्रति युनिट जास्तीत जास्त एक कोटी रुपये मुदत कर्ज किंवा भांडवली कर्जासाठी सहाय्य केले जाते. कोणत्याही तारणाशिवाय तसेच कोणच्याही हमी शिवाय नव्या अथवा विद्यमान सूक्ष्म व लघु उद्योगांना हे सहाय्य केले जाते. या योजनेअंतर्गत येणाऱ्या युनिट्स व्यवस्थापनाच्या नियंत्रणाबाहेरील काही कारणामुळे अडचणीत आल्यास त्यांच्या पुनर्उभारणीसाठी कर्जपुरवठादारांनी देऊ केलेले सहाय्य देखील फेरउभारणीसाठी या योजनेअंतर्गत समाविष्ट करता येते.

# कर्ज हमी निधी योजना

**योजनेविषयी**

सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांना तारणविरहित कर्ज उपलब्ध करून देण्याचे या योजनेचे उद्दिष्ट आहे. नवे तसेच विद्यमान उद्योगही यात समाविष्ट आहेत. एमएसएमई मंत्रालय व सिडबीने यासाठी क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्ट फॉर मायक्रो अँड स्मॉल एंटरप्राइजेस (सीजीटीएमएसई) या ट्रस्टची स्थापना केली आहे. याद्वारे ही योजना राबवली जाते.

# कर्ज हमी निधी योजना

**अर्ज कसा करावा**

पात्रता निकषांची पूर्तता करणाऱ्या अर्जदारांनी ही योजना लागू असलेल्या बँका अथवा वित्त संस्थांशी संपर्क साधावा. यामध्ये शेड्यूल्ड व्यापारी बँका व निवडक विभागीय ग्रामीण बँका (आरआरबी) चाही समावेश आहे.

**व्हिडिओ लिंक्स**

या योजनेचा लाभ घेतलेल्या काही उद्योजकांचे अनुभव येथे पाहता येतील.

https://youtu.be/oey34u3HPXg

https://youtu.be/65bsxuVZGBU

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | **कर्जपुरवठा (३/७)** | इन्क्युबेशन | अन्य |

# कामगिरी व पत (कर्ज) मानांकन

**कोण अर्ज करू शकते**
देशातील कोणतेही नोंदणीकृत सूक्ष्म वा लघू उद्योजक यासाठी पात्र आहेत.

**सहाय्याचे स्वरूप**
५० लाख रुपयांपर्यंत उलाढाल असलेल्या सूक्ष्म व लघू उद्योगांसाठी - शुल्काच्या ७५ टक्क्यांपर्यंतचा परतावा किंवा २५ हजार रुपये (यापैकी जे कमी असेल ते).
५० लाख ते २ कोटी रुपयांपर्यंत उलाढाल असलेल्या उद्योगांसाठी -शुल्काच्या ७५ टक्क्यांपर्यंतचा परतावा किंवा ३० हजार रुपये (यापैकी जे कमी असेल ते).
दोन कोटींहून अधिक उलाढाल असलेल्या उद्योगांसाठी - शुल्काच्या ७५ टक्क्यांपर्यंतचा परतावा किंवा ४० हजार रुपये (यापैकी जे कमी असेल ते).

# कामगिरी व पत (कर्ज) मानांकन

**योजनेविषयी**

विश्वासार्ह बाह्य संस्थेकडून (थर्ड पार्टी) सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या क्षमता आणि कर्जपात्रतेबाबतचे मत जाणून घेत या उद्योजकांचे त्यांच्या विद्यमान कार्यपद्धतीतील बलस्थाने व कमतरता याविषयी प्रबोधन केले जाते. त्यांना त्यांच्या संस्थात्मक क्षमता वृद्धिंगत करता याव्यात आणि त्यांचे पतमानांकन सुधारावे व त्याद्वारे त्यांना कमी व्याजदरात व सुलभ कर्ज उपलब्ध व्हावे, यासाठी ही संधी दिली जाते. या योजनेद्वारे त्यांना बँका, वित्तसंस्था, ग्राहक किंवा खरेदीदार व पुरवठादारांमधील त्यांची स्वीकारार्हता वाढविण्यासही मदत करते.

कार्यपद्धती

राष्ट्रीय लघुउद्योग महामंडळ (एनएसआयसी) ही या योजनेसाठी प्रमुख संस्था (नोडल एजन्सी) आहे. सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना त्यांच्या कामगिरी व पत मानांकनाच्या एकत्रित मूल्यांकनाच्या आधारे मानांकन दिले जाते. यात कर्ज व कामगिरी, कार्यपद्धती, आर्थिक, व्यावसायिक आणि व्यवस्थापनातील धोके आदी घटकांचा एकत्रित विचार केला जातो. सूक्ष्म व लघु उद्योगांना एनएसआयसीकडे या योजनेअंतर्गत नोंदणीकृत असलेल्या संस्थांपैकी कोणत्याही संस्थेची निवड करण्याची मुभा आहे.

# कामगिरी व पत (कर्ज) मानांकन

मानांकन पत्र मिळाल्यानंतर पुढील एक वर्ष हे मानांकन ग्राह्य धरले जाते. या स्वतंत्र मूल्यांकनामुळे अर्जदार उद्योजकांना त्यांची बलस्थाने व कमतरतांची जाणीव होऊन ते बँका व वित्तीय संस्थांची मदत घेऊन त्वरित आर्थिक निर्णय घेऊ शकतात.

**अर्ज कसा करावा**

या योजनेअंतर्गत मानांकनासाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या सूक्ष्म व लघु उद्योजकांना विहित नमुन्यातील अर्ज भरून तो राष्ट्रीय लघुद्योग महामंडळाच्या (एनएसआयसी) लगतच्या कार्यालयात किंवा संबंधित मानांकन संस्थेकडे सादर करता येईल. किंवा सीएआरई, क्रिसिल, इंडिया रेटिंग्ज, आयसीआरए, ओएनआयसीआरए, एसएमईआरए, डून अँड ब्रॅडस्ट्रीट (डीअँडबी) या सूचीबद्ध मानांकन संस्थेकडेही हा अर्ज देता येईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | **कर्जपुरवठा (४/७)** | इन्क्युबेशन | अन्य |

# बिल डिस्काउंटिंग

**कोण अर्ज करू शकते**

उद्योजक

**सहकार्याचे स्वरूप**

| अनुक्रमांक | विशेषण | व्याजदर |
|---|---|---|
| 1 | एनएसआयसी मानांकनाअंतर्गत एसई १ ए मानांकन असणारी युनिट्स | १२.४० टक्के |
| 2 | एनएसआयसी मानांकनाअंतर्गत एसई २ ए मानांकन असणारी युनिट्स | १२.९० टक्के |
| 3 | एनएसआयसी मानांकनाअंतर्गत एसई १ बी मानांकन असणारी युनिट्स | १२.९० टक्के |
| 4 | अन्य युनिट्स | १३.४० टक्के |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | **कर्जपुरवठा (५/७)** | इन्क्युबेशन | अन्य |

# मायक्रो फायनान्स प्रोग्रॅम

**कोण अर्ज करू शकते**

मायक्रो फायनान्सिंग संस्था किंवा स्वयंसेवी संस्था

**सहाय्याचे स्वरूप**

केंद्र सरकार मायक्रो फायनान्स प्रोग्रॅमसाठी सिडबीला निधी देते. त्याला पोर्टफोलिओ रिस्क फंड (पीआरएफ) म्हटले जाते. सध्या सिडबी कर्जाच्या १० टक्के रक्कम मुदत ठेव (फिक्स्ड डिपॉझिट) म्हणून घेते. यात मायक्रो फायनान्सिंग संस्था अथवा स्वयंसेवी संस्थांचा हिस्सा अडीच टक्के असतो (सुरक्षा ठेवीच्या २५ टक्के) व उर्वरित साडेसात टक्के (सुरक्षा ठेवीच्या ७५ टक्के) हे सरकारकडून मिळालेल्या निधीतून दिले जातात.

# मायक्रो फायनान्स प्रोग्रॅम

**योजनेविषयी**

उद्योजकांना सिडबीकडून कर्ज मिळण्यासाठी सुरक्षा ठेव ठेवता यावी त्यासाठी मायक्रो फायनान्सिंग संस्था व स्वयंसेवी संस्थांकडून निधी मिळावा, याकरता केंद्र सरकारने मायक्रो फायनान्स योजना सुरू केली असून ती सिडबीतर्फे राबवल्या जाणाऱ्या योजनांशी जोडली आहे. मागास राज्य किंवा राज्यांमधील मागास विभागात-जिल्ह्यात ही योजना राबवली जाते.

**अर्ज कसा करावा**

विहित नमुन्यातील प्रस्ताव सिडबीकडे सादर करावा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | **कर्जपुरवठा (६/७)** | इन्क्युबेशन | अन्य |

# बँक कर्ज सहाय्य

**कोण अर्ज करू शकते**
सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजक

**सहाय्याचे स्वरूप**
बँकांना कर्जप्रकरणासाठी आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता व अर्ज सादरीकरण राष्ट्रीय लघुद्योग महामंडळातर्फे (एनएसआयसी) केली जाते.

# बँक कर्ज सहाय्य

**योजनेविषयी**

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक उद्योगांच्या कर्जाच्या गरजा भागविण्यासाठी, एनएसआयसीने विविध राष्ट्रीयीकृत तसेच खासगी बँकांसोबत सामंजस्य करार केला आहे. या बँकांच्या सहकार्याने एनएसआयसी सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना विना खर्च कर्ज मिळवून देण्यासाठी प्रयत्न करते. एनएसआयसीच्या परफॉर्मन्स अँड क्रेडिट रेटिंग स्कीम अंतर्गत मानांकन झालेल्या सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना त्यांच्या इच्छेनुसार मान्यताप्राप्त मानांकन संस्थांमधून हवी ती संस्था निवडण्याचे स्वातंत्र्य असते. त्याद्वारे त्यांची व्यावसायिक पत सक्षमता वाढते व त्यांना वेळेवर व योग्य दरात कर्जही उपलब्ध होते.

**अर्ज कसा करावा**

एनएसआयसीच्या http://www.nsic.co.in या वेबसाइटवरून बँक कर्ज साह्यासाठीचा अर्ज डाउनलोड करता येऊ शकतो.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | **कर्जपुरवठा (७/७)** | इन्क्युबेशन | अन्य |

# पीएमईजीपी - पंतप्रधान रोजगार निर्माण योजना

**कोण अर्ज करू शकते**
यासाठी अठरा वर्षांपुढील कोणतीही व्यक्ती अर्ज करू शकते. मात्र, उत्पादन क्षेत्रातील दहा लाख रुपयांहूनअधिक रकमेच्या प्रकल्पासाठी तर व्यवसाय अथवा सेवा क्षेत्रातील संबंधित लाभार्थी हा किमान आठवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत केवळ नवीन प्रकल्पांनाच मान्यता दिली जाते.
स्वयंसहाय्यता गट (दारिद्र्यरेषेखालील नागरिकांसह, अन्य कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसणे आवश्यक), सोसायटीज रजिस्ट्रेशन अॅक्ट १८६० अंतर्गत नोंदणीकृत सोसायट्या, उत्पादन क्षेत्रातील सहकारी संस्था, विश्वस्त संस्थाही पात्र आहेत.

**सहाय्याचे स्वरूप**
उत्पादन क्षेत्रातील प्रकल्प अथवा केंद्रांना जास्तीत जास्त २५ लाख रुपये व सेवा क्षेत्रातील व्यवसायांना १० लाख रुपयांपर्यंत सहाय्य केले जाते.

# पीएमईजीपी - पंतप्रधान रोजगार निर्माण योजना

| पीईएमजीपी लाभार्थ्यांची श्रेणी | लाभार्थ्यांना द्यावा लागणारा हिस्सा (प्रकल्प खर्चाच्या तुलनेत) | अनुदानाची टक्केवारी (प्रकल्प खर्चाच्या तुलनेत)<br>शहरी ग्रामीण |
|---|---|---|
| सर्वसाधारण श्रेणी | १० टक्के | १५ टक्के - २५ टक्के |
| विशेष (एससी-एसटी-ओबीसी-अल्पसंख्याक-महिला-माजी सैनिक-दिव्यांग-ईशान्य भारतातील रहिवासी-दुर्गम भागातील रहिवासी | ५ टक्के | २५ टक्के -३५ टक्के |

# पीएमईजीपी - पंतप्रधान रोजगार निर्माण योजना

प्रकल्प खर्चाच्या उर्वरित रकमेसाठी बँकांकडून मुदत कर्ज किंवा खेळत्या भांडवलाच्या स्वरूपात मिळू शकते.

**योजनेविषयी**

ही योजना राष्ट्रीय पातळीवरील नोडल एजन्सी म्हणून खादी व ग्रामोद्योग आयोगातर्फे राबवली जाते. राज्य पातळीवर ही योजना राज्य खादी व ग्रामोद्योग संचालनालय, राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ (केव्हीआयबी) व जिल्हा उद्योग केंद्रांमार्फत (डीआयसी) व बँकांमार्फत राबवली जाते. यासाठी मिळणारे सरकारी अनुदान खादी व ग्रामोद्योग आयोगातर्फे निश्चित केलेल्या बँकांमार्फत संबंधित लाभार्थी व आंत्रप्रेनर्सच्या बँक खात्यात जमा केले जाते.

# पीएमईजीपी - पंतप्रधान रोजगार निर्माण योजना

**अर्ज कसा करावा**

खादी ग्रामोद्योग आयोगाचे राज्य व विभागीय संचालक खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या व राज्याच्या उद्योग विभागाच्या संचालकांशी चर्चा करून स्थानिक वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक वाहिन्यांद्वारे या संदर्भात जाहिरात देतात. याद्वारे या योजनेअंतर्गत स्वताचे उत्पादन केंद्र सुरू करू इच्छिणाऱ्या संभाव्य लाभार्थ्यांकडून प्रकल्पाचे प्रस्ताव मागवले जातात. यासाठी इच्छुक उमेदवार http://www.kviconline.gov.in/pmegp या लिंकवरून तसेच pmegp या ॲपवरून ऑनलाइन पद्धतीने अर्ज करू शकतील. अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंटआउट काढून आवश्यक कागदपत्रे, प्रकल्पाचा सविस्तर आराखडा जोडून संबंधित कार्यालयाकडे जमा करता येईल.

**व्हिडिओ लिंक**

या योजनेचा लाभ घेतलेल्या काही उद्योजकांचे अनुभव व्हिडिओच्या माध्यमातून पाहता येतील.
https://youtu.be/vO0A-Kdul.14

# ड) इन्क्युबेशन सपोर्ट स्कीम्स

१) इन्क्युबेटर्सच्या माध्यमातून लघु व मध्यम उद्योगांचा उद्योजकीय व व्यवस्थापकीय विकास...........१३०
२) ॲस्पायर - (नवसंशोधन, आंत्रप्रेनरशिप व कृषी उद्योगाच्या प्रसारासाठीची योजना)..................१३३
३) राष्ट्रीय लघुद्योग महामंडळ - माहिती तंत्रज्ञान इनक्युबेटर..............................................१३७

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | **इन्क्युबेशन (१/३)** | अन्य |

# इन्क्युबेटर्सच्या माध्यमातून लघु व मध्यम उद्योगांचा उद्योजकीय व व्यवस्थापकीय विकास

**कोण अर्ज करू शकते**

व्यापारी-व्यावसायिक स्वरूपाची संकल्पना असलेला कोणताही व्यक्ती अथवा एमएसएमई थेट होस्ट संस्थांकडे अर्ज करू शकतात. (उदा. आयआयटीज, एनआयटीज, तांत्रिक कॉलेजेस, संशोधन संस्था आदी).

होस्ट संस्था म्हणून काम करण्यास उत्सुक कोणत्याही तांत्रिक संस्थेने (स्वारस्य अभिव्यक्तीत म्हटल्याप्रमाणे) एमएसएमई विकास आयुक्तांच्या कार्यालयाकडे अर्ज करावा किंवा आर्थिक साह्यासाठी नजिकच्या एमएसएमई विकास विभागाशी संपर्क साधावा.

# इन्क्युबेटर्सच्या माध्यमातून लघु व मध्यम उद्योगांचा उद्योजकीय व व्यवस्थापकीय विकास

**सहाय्याचे स्वरूप**

होस्ट इन्स्टिट्यूट्सना आवश्यक प्लांट व मशिनरी (हार्डवेअर-सॉफ्टवेअरसह) उभारता यावी, यासाठी एक कोटी रुपयांपर्यंतचे अनुदान दिले जाते. बिझनेस इन्क्युबेटर्सना त्यांच्या संशोधन व विकास सुविधा अधिक सक्षम करता याव्यात, यासाठी व सामायिक सुविधांच्या विकासासाठी हा निधी दिला जातो. हा निधी प्रत्येकी ५० लाख रुपयांच्या दोन टप्प्यात दिला जातो.

**निर्विवाद संकल्पनेसाठी सहाय्याचे स्वरूप**

केंद्र सरकार प्रत्येक संकल्पनेसाठी होस्ट इन्स्टिट्यूटला जास्तीत जास्त १५ लाख रुपयांपर्यंतचे अनुदान देते. सर्वसाधारणपणे या प्रकल्प किंवा संकल्पनेची कालमर्यादा एक वर्षाची असते. आवश्यकतेनुसार त्यात वाढही करता येते. विद्यार्थ्यांना या योजनेत कोणताही हिस्सा द्यावा लागत नाही. तर सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक व अन्य उद्योजकांना प्रकल्प खर्चाच्या १५ टक्के हिस्सा द्यावा लागतो.

# इन्क्युबेटर्सच्या माध्यमातून लघु व मध्यम उद्योगांचा उद्योजकीय व व्यवस्थापकीय विकास

**योजनेविषयी**

या योजनेचा मुख्य उद्देश हा नागरिकांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे तसेच उत्पादन क्षेत्रातील व ज्ञानाधारित सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटकांना त्यांच्या संकल्पना प्रत्यक्षात सिद्ध करता याव्यात, यासाठी त्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहित करणे हा आहे. या योजनेद्वारे डिझाइन, धोरणनिश्चिती व अंमलबजावणीसाठी तज्ज्ञांचा सल्लाही घेता येतो. एक वर्षभरात प्रत्यक्ष बाजारपेठेत येऊ शकतील, अशा व्यावसायिक संकल्पनांना सुरूवातीच्याच टप्प्यात निधी पुरवून पाठबळ देण्याचाही या योजनेचा उद्देश आहे.

**अर्ज कसा करावा**

होस्ट इन्स्टिटयूट बनण्याची इच्छा असलेल्या तांत्रिक संस्था अर्ज करू शकतात. या संदर्भात स्वारस्य अभिव्यक्ती किंवा अर्ज मागविण्यासाठी जाहिराती दिल्या जातात.

कोणतीही व्यक्ती अथवा एमएसएमई त्यांच्या नजिकच्या होस्ट इन्स्टिट्यूटकडे अर्ज करू शकतो. या संस्थांची यादी http://www.dcmsme.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | **इन्क्युबेशन (२/३)** | अन्य |

# ॲस्पायर- (नवसंशोधन, आंत्रप्रेनरशिप व कृषी उद्योगाच्या प्रसारासाठी योजना)

**कोण अर्ज करू शकते**

तांत्रिक ज्ञान अथवा संशोधनाच्या आधारे व्यावसायिक संकल्पना प्रत्यक्षात आणू शकणाऱ्या व्यक्ती अथवा कृषीआधारित व्यावसायिक. त्यांना ज्ञान सहयोगी संस्था (नॉलेज पार्टनर) म्हणून संबोधण्यात येईल. ते सध्या अस्तित्वात असलेल्या तंत्रज्ञानाचा किंवा नवतंत्रज्ञानाचा व्यावसायिक वापर करण्याच्या दृष्टीने काम करतील. इन्क्युबेटर-इन्क्युबेशनसाठी तसेच ही योजना व बिझनेस इन्क्युबेटर्स अथवा तंत्रज्ञान, बिझनेस इन्क्युबेटर्स व सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग घटक किंवा एनएसआयसी किंवा केव्हीआयसी किंवा कॉयर बोर्ड किंवा अन्य मंत्रालय किंवा विभाग यांच्या इन्क्युबेशन योजना तसेच खासगी इन्क्युबेटर्स.

**सहाय्याचे स्वरूप**

उत्पादन केंद्र व यंत्रणेसाठी १०० टक्के अनुदान एकरकमी दिले जाते. हे अनुदान (जमीन व बांधकामाशिवाय) जास्तीत जास्त एक कोटी रुपयांपर्यंत दिले जाते.

# ॲस्पायर- (नवसंशोधन, आंत्रप्रेनरशिप व कृषी उद्योगाच्या प्रसारासाठी योजना)

इन्क्युबेशन सेंटर हे एनएसआयसी, केव्हीआयसी, कॉयर बोर्ड किंवा अन्य कोणत्याही संस्था, केंद्र अथवा राज्य सरकारी संस्थासोबत खासगी सार्वजनिक भागीदारीतून (पीपीपी) उभारले जाणार असल्यास त्यासाठी एकरकमी ५० टक्के किंवा जास्तीत जास्त ५० लाख रुपये उत्पादन केंद्र व यंत्रणेसाठी (जमीन व बांधकामाशिवाय) दिले जातात. प्रशिक्षणासाठी येणारा खर्च प्रशिक्षण संस्थांसाठी सहाय्य (असिस्टन्स टू ट्रेनिंग इन्स्टिट्यूशन-एटीआय) योजनेअंतर्गत दिला जातो.

**योजनेविषयी**

या योजनेची महत्त्वाची वैशिष्ट्ये

नव्या रोजगारसंधी निर्माण करणे व बेरोजगारी कमी करणे.

भारतात उद्योजकता संस्कृती रूजवणे.

जिल्हापातळीवर आर्थिक विकासाला चालना देणे.

अद्याप कायम असलेल्या सामाजिक गरजांसाठी नवसंशोधन, व्यवसायांसाठी सहाय्य करणे.

एमएसएमई क्षेत्राची स्पर्धात्मकता अधिक वाढावी, यासाठी नवसंशोधनावर अधिक भर देणे.

# ॲस्पायर- (नवसंशोधन, आंत्रप्रेनरशिप व कृषी उद्योगाच्या प्रसारासाठी योजना)

**अर्ज कसा करावा**

यासाठी पूर्ण भरलेले अर्ज एमएसएमई मंत्रालयाच्या ॲस्पायर योजना सुकाणू समितीकडे पाठवता येतील. संपूर्ण योजना, समन्वय, व्यवस्थापन साहाय्य यासाठी ही सुकाणू समिती जबाबदार असेल. एमएसएमई मंत्रालयाचे सचिव या समितीचे अध्यक्ष असतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | **इन्क्युबेशन (३/३)** | अन्य |

# राष्ट्रीय लघुद्योग विकास महामंडळ - माहिती तंत्रज्ञान इन्क्युबेटर (एनएसआयसी - आयटी इन्क्युबेटर)

**कोण अर्ज करू शकते**

उद्योजक बनण्याची इच्छा असलेले किंवा स्वतःचा व्यवसाय (एन्टरप्राईज) सुरू केलेले उद्योजक, औद्योगिक भागीदाराकडून अंशतः अर्थसाहाय्य मिळणारा व त्यासाठी उत्पादने विकसित करणारा जवळपासच्या विद्यापीठांमधील संशोधकांचा समूह.

विद्यार्थी अथवा ज्यांना औद्योगिक क्षेत्रातील कामाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायचा आहे, असे स्टार्टअप्ससाठीचे संभाव्य कर्मचारी.

उद्योगक्षेत्रात नाव कमावलेल्या आणि त्याचबरोबर स्वतः उत्पादन विकसित करण्याची इच्छा असलेल्या व्यक्ती अर्ज करण्यास पात्र आहेत.

# राष्ट्रीय लघुद्योग विकास महामंडळ - माहिती तंत्रज्ञान इन्क्युबेटर (एनएसआयसी - आयटी इन्क्युबेटर)

**सहाय्याचे स्वरूप**

- काम सुरू करता येण्याजोगी तयार जागा, पुरेशा कम्प्युटर हार्डवेअर सुविधा, सॉफ्टवेअर लायब्ररीचा वापर करण्याची मुभा, इंटरनेट व बिझनेस सेंटर सुविधा.
- प्राथमिक प्रशिक्षण-समुपदेशन, व्यावसायिक आराखड्यांना (बिझनेस प्लॅन) मूर्त रूप देण्यासाठी सहाय्य, विशेष प्रशिक्षण, मार्गदर्शन सुविधा, बाजारपेठेविषयी मार्गदर्शन व सहाय्य
- बीजभांडवलासाठी किंवा साहस भांडवलासाठी (व्हेंचर कॅपिटल) उच्चस्तरीय सहाय्य, बाजारपेठ सर्वेक्षण, कायदेशीर पूर्तता, कागदपत्रांची पूर्तता.
- व्यवसाय भागीदारांचा शोध, संयुक्त उपक्रम अथवा तंत्रज्ञान हस्तांतरण, व्यवसाय (एंटरप्राइज) सुरू करण्यासाठी कायदेशीर व वैधानिक औपचारिकता, निवड प्रक्रिया.

# राष्ट्रीय लघुद्योग विकास महामंडळ - माहिती तंत्रज्ञान इन्क्युबेटर (एनएसआयसी - आयटी इन्क्युबेटर)

**योजनेविषयी**

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात विशेषतः पहिल्या पिढीतील उद्योजकांमध्ये शाश्वत उद्योजकता विकसित करणे, त्यासाठी नाविन्यपूर्ण संकल्पना व्यवहार्य व्यावसायिक संकल्पनांमध्ये परावर्तित करणे, संशोधन व विकासातून साध्य झालेल्या शोधांचे व्यापारीकरण करण्यासाठी प्रोत्साहन देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. स्टार्टअप्स यशस्वी लघुद्योग बनण्यासाठी राष्ट्रीय लघुद्योग महामंडळाचे सहकार्यही या योजनेद्वारे मिळते. एनएसआयसी इन्क्युबेटरमधील जागा आणि सुविधांचा वापर करण्यासाठी संभाव्य उद्योजकांना दरमहा परवाना शुल्क द्यावे लागते. याशिवाय बिझनेस सेंटर, दूरध्वनी व इंटरनेटचे शुल्क वापरानुसार द्यावे लागते. मार्केटिंग, कायदेशीर सेवा व अकाउंट्स सेवांसारख्या तज्ज्ञांच्या सेवांसाठीचे शुल्कदेखील संबंधित उद्योजकाला भरावे लागते.

# राष्ट्रीय लघुद्योग विकास महामंडळ - माहिती तंत्रज्ञान इन्क्युबेटर (एनएसआयसी - आयटी इन्क्युबेटर)

**अर्ज कसा करावा**

पूर्ण भरलेले अर्ज खालील पत्त्यावर पाठवावेत.

प्रोजेक्ट मॅनेजर- एनएसआयसी टीबीआय ओखला,
एनटीएससी प्रिमायसेस, ओखला इंडस्ट्रियल इस्टेट,
नवी दिल्ली -११००२०
दूरध्वनी - ०११-२६९२६५१३
ई-मेल - itincubetor@nsic.co.in

# ई) अन्य योजना

१) विज्ञान व तंत्रज्ञान योजना........................................................................ १४३
२) खादी कारागिरांसाठी जनश्री विमा योजना........................................................ १४६
३) काथ्या कामगारांसाठी व्यक्तिगत अपघात विमा................................................ १४९
४) उद्योग व व्यापारासंबंधी कामकाज सहाय्य सुविधा............................................ १५४

क्षमतावृद्धी | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | **अन्य (१/४)**

# विज्ञान व तंत्रज्ञान योजना

**कोण अर्ज करू शकते**

या अंतर्गत होणारे संशोधन काथ्या उद्योग व देशांतर्गत तसेच अन्य देशातील व्यापारासाठी उपयुक्त ठरते.

**सहाय्याचे स्वरूप**

तंत्रज्ञान हस्तांतर, इन्क्युबेशन, चाचणी व सेवा सुविधा

# विज्ञान व तंत्रज्ञान योजना

**योजनेविषयी**

या योजनेअंतर्गत प्रत्यक्ष वापर होऊ शकेल अशा प्रयोगशाळेतील संशोधनावर भर दिला जातो. त्याचबरोबर चाचणी म्हणजेच टेस्टिंग व सेवा सुविधादेखील पुरवल्या जातात. मंडळाच्या संशोधन आणि विकास  उपक्रमाअंतर्गत कलवूर येथील सेंट्रल कॉयर रिसर्च इन्स्टिट्यूट आणि बेंगळुरू येथील सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ कॉयर टेक्नोलॉजीसह अन्य संस्थांमार्फत संशोधन केले जाते.

**अर्ज कसा करावा**

व्यापारी, उत्पादक, उद्योजक व काथ्या कामगार संशोधन केंद्रांशी संपर्क साधून तंत्रज्ञान हस्तांतरण, इन्क्युबेशन, चाचणी व सेवा सुविधांचा वापर करण्यासाठी सहाय्य मागू शकतात.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | **अन्य (२/४)** |

# खादी कामगारांसाठी जनश्री विमा योजना

**कोण अर्ज करू शकते**

१८ ते ५९ या वयोगटातील खादी कारागीर (स्पिनर्स व विव्हर्स) अर्ज करू शकतात. हे कारागीर दारिद्य रेषेखालचे किंवा त्यापेक्षा किंचित अधिक उत्पन्न असलेले असावेत.

**सहाय्याचे स्वरूप**

१) नैसर्गिक मृत्यू - २० हजार रुपये

२) अपघाती मृत्यू ५० हजार रुपये-

कायमस्वरूपी अपंगत्व (दोन्ही डोळे अथवा हात-पाय गमावावे लागल्यास) ५० हजार रुपये. अंशतः आलेल्या अपंगत्वासाठी (एक

डोळा अथवा एक हात अथवा पाय गमवावा लागल्यास) २५ हजार रुपये.

मोफत अतिरिक्त लाभ - नववी ते बारावीत शिकणाऱ्या खादी कारागीरांच्या मुलांना दर तिमाहीस ३०० रुपये शिष्यवृत्ती. एका कुटुंबात जास्तीत जास्त दोन मुलांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.

# खादी कामगारांसाठी जनश्री विमा योजना

**योजनेविषयी**

खादी कामगारांना विमा कवच उपलब्ध व्हावे, यासाठी खादी कामगार जनश्री विमा योजना ही समूह विमा (ग्रुप इन्शुरन्स) योजना सादर तयार करण्यात आली आहे. खादी व ग्रामोद्योग विभागातर्फे भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या (एलआयसी) सहकार्याने ही योजना विकसित करण्यात आली आहे.

**अर्ज कसा करावा**

निधन झालेल्या खादी कारागिराच्या वारसदारांनी निधन झालेला कारागीर सभासद असलेल्या खादी संस्थेमार्फत भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसीच्या कार्यालयात मूळ मृत्यू दाखला सादर करावा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षमतावृद्धी | व्यवसायविस्तारासाठी सहाय्य | कर्जपुरवठा | इन्क्युबेशन | **अन्य (३/४)** |

# काथ्या कामगारांसाठी व्यक्तिगत अपघात विमा

**कोण अर्ज करू शकतो**

वय वर्षे १८ व त्यापुढील (वयोमर्यादेचे बंधन नाही) काथ्या उद्योगात काम करणारे कामगार या विमा योजनेअंतर्गत समाविष्ट आहेत. अपंगत्व आलेले काथ्या कामगार किंवा त्यांचे अथवा निधन झालेल्या काथ्या कामगाराचे वारसदार विमा परताव्यासाठी अर्ज करू शकतात. या कामगारांमध्ये महिलांचे असलेले मोठे प्रमाण लक्षात घेता त्यांच्यासाठी त्यांच्याबाबतीत नसबंदी अथवा तत्सम गुंतागुंतीतून मृत्यू किंवा अपंगत्व, गरोदरपणातील मृत्यू, प्रसुतीदरम्यानचा मृत्यू, सिझेरियनदरम्यान मृत्यू, स्तन काढून टाकणे अथवा खून किंवा बलात्कार याचाही या योजनेअंतर्गत समावेश आहे.

# काथ्या कामगारांसाठी व्यक्तिगत अपघात विमा

**सहाय्याचे स्वरूप**

या योजनेअंतर्गत मिळणारी नुकसानभरपाई खालीलप्रमाणे

अपघाती मृत्यू - ५० हजार रुपये

कायमस्वरूपी संपूर्ण अपंगत्व - ५० हजार रुपये

कायमस्वरूपी अंशतः अपंगत्व - २५ हजार रुपये

बोट कापले गेल्यास तरतूद - कोणते बोट कापले गेले आहे, त्यावर अवलंबून तसेच एकूण विमा रकमेच्या तुलनेत विशिष्ट मर्यादेत.

# काथ्या कामगारांसाठी व्यक्तिगत अपघात विमा

**योजनेविषयी**

काथ्या मंडळातर्फे वेल्फेअर मेजर्स - कॉयर वर्कर्स ग्रुप पर्सनल ॲक्सिडेंट इन्शुरन्स ही योजना राबवली जाते. त्याद्वारे मृत अथवा जायबंदी काथ्या कर्मचारी अथवा त्यांच्या वारसदारांना आर्थिक नुकसानभरपाई दिली जाते. यासाठी विमा हप्ता हा पूर्णपणे काथ्या मंडळातर्फे भरण्यात येतो त्यासाठी दरपत्रक (कोटेशन) मागवून विमा कंपनीची निवड केली जाते. अपघात झाल्यास किंवा दुर्घटना झाल्यास विमा कंपनीकडून संबंधित काथ्या कर्मचारी किंवा त्याच्या वारसदारांना नुकसानभरपाईची रक्कम दिली जाते

**अर्ज कसा करावा**

प्रतिपूर्ती दावा दाखल करण्याची वेळ आल्यास संबंधित कर्मचारी अथवा त्याच्या वारसदारांनी काथ्या मंडळाच्या माध्यमातून विशिष्ट कालमर्यादेच्या आत हा अर्ज सादर करावा.

क्षमतावृद्धी      व्यवसायविस्तारासाठी सहाय्य      कर्जपुरवठा      इन्क्युबेशन      **अन्य (४/४)**

# व्यापार आणि उद्योगाशी संबंधित कार्यकारी सेवा सुविधा (टीआयआरएफएसएस)

**कोण अर्ज करू शकते**

काथ्या कर्मचारी, नवे आंत्रप्रेनर्स या योजनेअंतर्गत मनुष्यबळ विकास कार्यक्रमांचा लाभ घेऊ शकतात.

**सहाय्याचे स्वरूप**

निर्यातदार देशांची यादी व तेथे होत असलेल्या निर्यातीचे प्रमाण याची माहिती दिली जाते. काथ्या उद्योगासाठी उपलब्ध क्षेत्रांचे सर्वेक्षण व अभ्यास केला जातो. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून काथ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या ज्ञानाचा योग्य वापर करता यावा, यासाठी मनुष्यबळ विकास उपक्रम आयोजिण्यात येतात.

# व्यापार आणि उद्योगाशी संबंधित कार्यकारी सेवा सुविधा (टीआयआरएफएसएस)

**योजनेविषयी**

उत्पादन, उत्पादकता, कामगार उपलब्धता, कच्चा माल, मार्केटिंग आदीबाबतीतील सांख्यिकी माहिती गोळा करून त्याआधारे व्यापार उद्योगांसाठी आवश्यक संदर्भ पुरवण्यात येतात. त्याचबरोबर काथ्या मंडळाच्या सर्वंकष व पद्धतशीर विकासासाठी सुयोग्य धोरणे निश्चित केली जातात. सर्वसामान्य नागरिकांना काथ्या मंडळाच्या योजनांचा व सेवांचा आढावा घेता यावा व काथ्या मंडळाचे काम अधिक पारदर्शी होण्यासाठी ई-गव्हर्नन्स व्यवस्था कार्यान्वित करावी. काथ्या कामगारांचे ज्ञान वृद्धिंगत होण्यासाठी मनुष्यबळ विकास उपक्रम आयोजित करणे.

**अर्ज कसा करावा**

मनुष्यबळ विकास उपक्रम आयोजित करण्यासाठी विविध विभागातील उद्योजक किंवा काथ्या कामगार मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडे अर्ज करू शकतात.